दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

**सुविचार**

"सत्तेचा मोह क्षणिक असतो; पण मूल्यांशी निष्ठा राखणारे नेतृत्वच समाजाचा विश्वास जिंकून इतिहास घडवते, हे काळ शेवटी निःसंशयपणे सिद्ध करतो."

**विद्यार्थ्यांचे साकडे**

**पुणे :** पोरे मरतील, परिस्थितीचं गांभीर्य ओळखा, असा गंभीर इशारा देत महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेच्या विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्र्यांकडे आर्त साद घातली आहे. सतत बदलणारे परीक्षा वेळापत्रक, विलंब, अनिश्चितता आणि मानसिक ताण यामुळे विद्यार्थ्यांचे आयुष्य धोक्यात आले असल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे. परीक्षा पद्धतीतील गोंधळामुळे अनेकांची वयाची मर्यादा संपत चालली आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. २ जानेवारी, २०२५ | वर्ष - १ | अंक - १०० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### जम्मू काश्मिरमध्ये जोरदार बर्फवृष्टी

**जम्मू :** बर्फवृष्टीनंतर काश्मीरला जम्मू प्रदेशाशी जोडणारा मुघल रोड आणि सिंथन टॉप रोड वाहन वाहतुकीसाठी बंद करण्यात आला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. तथापि, जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग वाहनांच्या वाहतुकीसाठी खुला राहिला, खराब हवामानामुळे प्रवाशांना दिवसा महामार्गावरून प्रवास करण्यास प्राधान्य देण्याचा सल्ला देण्यात आला आहे. मुघल रोड आणि सिंथन रोड बर्फवृष्टीमुळे बंद आहेत. ते पूर्ववत होईपर्यंत लोकांना या रस्त्यांवरून प्रवास करू नये.

### न्यप्राणाच्या हल्ल्यात महिला ठार

**चंपावत :** उत्तराखंडमधील अल्मोडा जिल्ह्यात एका अज्ञात वन्य प्राण्याने हल्ला करून एका महिलेचा मृत्यू झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. बुधवारी संध्याकाळी काही महिला चारा गोळा करण्यासाठी जंगलात गेल्या असताना ही घटना घडली. यावेळी, खल्योन क्यारी गावातील ६० वर्षीय बाचुली देवी हिच्यावर प्राण्याने हल्ला केला, असे त्यांनी सांगितले. शोध घेतल्यानंतर, महिलेचा मृतदेह घटनास्थळापासून सुमारे २०० मीटर अंतरावर आढळून आला.

### जानेवारी अखेर भारत टॅक्सी सुरू होणार

**नवी दिल्ली :** सहकार-समर्थित राइड-हेलिंग सेवा भारत टॅक्सी जानेवारीच्या अखेरीस दिल्ली आणि इतर शहरांमध्ये अधिकृतपणे सुरू केली जाईल, तिच्या सॉफ्ट लॉंच दरम्यान मिळालेल्या उत्साहवर्धक प्रतिसादानंतर, सहकार मंत्रालयाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. सहकार टॅक्सी कोऑपरेटिव्ह लिमिटेड द्वारे संचालित हे डिजिटल प्लॅटफॉर्म २ डिसेंबर २०२४ रोजी प्रायोगिक तत्वावर राजधानीत सुरू करण्यात आले.

## १५ ऑगस्ट २०२७ रोजी रूळावरून धावणार

# भारताच्या पहिल्या बुलेट ट्रेनचा मुहूर्त ठरला!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : भारतातील पहिली बुलेट ट्रेन केव्हा धावणार याची घोषणा रेल्वेमंत्र्यांनी केली आहे. पुढील वर्षी १५ ऑगस्ट रोजी ती धावेल असे त्यांनी नववर्षाच्या पहिल्या दिनी सांगितले.**



भारताची पहिली बुलेट ट्रेन कधी धावणार? याबाबत आता अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत मोठी घोषणा केली आहे. देशाची पहिली बुलेट ट्रेन १५ ऑगस्ट २०२७ पासून सुरु होईल, अशी घोषणा रेल्वे मंत्र्यांनी केली. अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेन प्रोजेक्टचा हा पहिला टप्पा असेल. या पहिल्या टप्प्यात गुजरातच्या सुरत ते बिलिमोरा अशी बुलेट ट्रेन सुरु होईल. या पहिल्या टप्प्यानंतर सुरत ते वापी असा दुसरा टप्पा राहील, अशी माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली.

गेल्या अनेक वर्षांपासून अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेन प्रकल्पाची चर्चा आहे. या प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहणाचं काम देखील झालं आहे. तसेच या प्रकल्पाचं काम दिवस-रात्र सुरु आहे. अतिशय कमी वेळात जास्त अंतर कापणारी ही देशातील पहिली जलद रेल्वे गाडी असणार आहे. त्यामुळे या ट्रेनकडे भारतीयांच्या मोठ्या अपेक्षा आहेत. अहमदाबाद-मुंबई हा देशातील पहिला बुलेट ट्रेन प्रकल्प आहे. या प्रकल्पाकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून प्रवाशांची प्रतिक्षा सुरु आहे. पण आता प्रवाशांसाठी आनंदाची बातमी आहे. कारण अहमदाबाद-मुंबई हा पहिला बुलेट ट्रेन मार्ग आता लवकरच सुरु होणार आहे.

अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेनच्या तिसऱ्या टप्प्यात सुरत ते अहमदाबाद अशी बुलेट ट्रेन सर्व्हिस सुरु होईल. तर चौथ्या टप्प्यात महाराष्ट्राच्या ठाण्यापर्यंत बुलेट ट्रेनची सर्व्हिस सुरु होईल. त्यानंतर शेवटच्या सहाव्या टप्प्यात अहमदाबाद ते मुंबई अशी पूर्ण सेवा सुरु होईल. देशातील ही पहिली बुलेट ट्रेन सर्व्हिस असणार आहे. तसेच या पहिल्या बुलेट ट्रेन सर्व्हिसला पूर्णपणे सुरु व्हायला अनेक वर्ष लागतील यात शंका नाही.

नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या माहितीनुसार, हे बुलेट ट्रेन प्रोजेक्ट एकूण ५०८ किमी लांबीचा आहे. यापैकी ३०८ किमीचा भाग हा गुजरातमध्ये आहे. तर १५६ किमीचा भाग हा महाराष्ट्रामध्ये तर ४ किमीचा भाग हा दादरा नगर हवेली इथे असणार आहे.

अहमदाबाद-बुलेट ट्रेनच्या मार्गावर एकूण १२ स्टेशन असणार आहेत. या मार्गाचं पहिलं स्टेशन हे साबरमती राहील. तर शेवटचं स्टेशन महाराष्ट्रातील मुंबई असेल. साबरमती नंतर पुढचं स्टेशन अहमदाबाद असेल. अहमदाबाद येथून निघाल्यानंतर ही ट्रेन गुजरातच्या आणंद, बडोदा, भरुच, सुरत, बिलिमोरा, वापी, बोईसर, विरार, ठाणे आणि शेवटचं स्टेशन मुंबई राहील. देशाची ही पहिली बुलेट ट्रेन ३२० किमी प्रिता तासच्या वेगाने धावेल आणि ५०८ किमीचं अंतर हे केवळ २ तास ७ मिनिटांत पूर्ण करेल.

## पुण्याचा महापौर भाजपचाच मुरलीधर मोहोळांचा विश्वास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत भाजप पुन्हा एकदा ऐतिहासिक विजय मिळवून पुन्हा भाजपचाच महापौर होईल, असा ठाम विश्वास केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला आहे. पुणेकरांनी नेहमीच विकासाच्या राजकारणाला आणि विचारधारेला साथ दिली आहे, त्यामुळे या निवडणुकीतही नागरिक महायुतीलाच कौल देतील, असे त्यांनी नमूद केले.

बाजीराव रस्त्यावरील भारत भवन येथे पुणे शहर भाजपच्या 'मीडिया सेंटर'चे उद्घाटन आज केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील आणि प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी आगामी निवडणुकीच्या रणनीतीवर आणि महायुतीतील घडामोडींवर प्रकाश टाकला. यावेळी ते बोलत होते.

मोहोळ यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून पुण्यात झालेल्या कामांचा पाढाच वाचला. मेट्रो विस्तार, सार्वजनिक वाहतुकीसाठी ई-बसेस, २४/७ पाणीपुरवठा योजना, नवीन विमानतळ टर्मिनल आणि चांदणी चौकातील पायाभूत सुविधांमुळे पुण्याचा चेहरामोहरा बदलला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पुण्याला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचा आमचा प्रयत्न यशस्वी होत आहे, आणि हाच विकास भाजपला पुन्हा सत्ता मिळवून देईल, असे मोहोळ यावेळी म्हणाले.

## वर्षाअखेरीस केवळ नोव्हेंबरचा हफ्ता जमा

# राज्यातील लाडक्या बहिणींचा हिरमोड!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे:** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांच्या खात्यात बुधवारी नोव्हेंबर महिन्याचा १५०० रुपयांचा हफ्ता जमा झाला. डिसेंबरअखेर असल्याने थकीत तीन महिन्यांचे एकत्रित ४५०० रुपये मिळतील, अशी आशा महिलांना होती; मात्र प्रत्यक्षात केवळ एकच हफ्ता आल्याने अनेकींचा अपेक्षाभंग झाला. डिसेंबर आणि जानेवारी महिन्यांच्या प्रलंबित हप्त्यांबाबत अद्यापही संभ्रम कायम आहे.

मागील तीन महिन्यांपासून प्रतीक्षेत असलेल्या महिलांना वर्षअखेरीस ३००० ते ४५०० रुपये एकत्रित मिळतील अशी अपेक्षा होती, मात्र प्रत्यक्षात केवळ नोव्हेंबरचा एकच हप्ता मिळाल्याने महिलांमध्ये काही प्रमाणात नाराजी पाहायला मिळत आहे. आता उर्वरित दोन महिन्यांचे पैसे नेमके कधी मिळणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. डिसेंबर महिना संपत आला तरी केवळ नोव्हेंबरचे पैसे खात्यात आल्याने लाभार्थी महिलांमध्ये अस्वस्थता आहे. या विलंबामागे ई-केवायसीची प्रक्रिया कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. शासनाने ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी ३१ डिसेंबर ही अंतिम मुदत दिली होती. ज्या महिलांची ही प्रक्रिया अपूर्ण आहे किंवा ज्यांचे आधार कार्ड बँकेशी लिंक नाही, अशा महिलांना पुढील लाभापासून मुकावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे उर्वरित हप्ते मिळण्यापूर्वी पात्र लाभार्थींची यादी पुन्हा एकदा तपासली जाण्याची शक्यता आहे.

ज्या महिलांना अद्याप खात्यात पैसे जमा झाल्याचा संदेश आलेला नाही, त्यांनी तांत्रिक कारणांमुळे किंवा बँक सर्व्हरच्या समस्येमुळे संदेश येण्यास उशीर होऊ शकतो हे लक्षात घेतले पाहिजे. अशा महिलांनी बँकेत जाऊन आपले पासबुक अपडेट करावे किंवा मोबाईल बँकिंगच्या माध्यमातून खात्यातील शिल्लक तपासावी, असे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात आले आहे. तसेच ई-केवायसी न केलेल्या महिलांचे हप्ते नवीन वर्षात कायमचे बंद होण्याचा धोका असल्याने, उर्वरित हप्त्यांचे वाटप हे पूर्णपणे केवायसीच्या यशस्वी पडताळणीवर अवलंबून असणार आहे. दुसरीकडे, ३१ डिसेंबरपर्यंत ई-केवायसी न केलेल्या महिलांना २०२६ पासून या लाभाला मुकावे लागण्याची शक्यता आहे. तांत्रिक कारणांमुळे ज्यांना एसएमएस आले नाहीत, त्यांनी बँक पासबुक तपासून खात्री करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. डिसेंबर आणि जानेवारीच्या हफ्त्यांबाबत अद्याप अनिश्चितता असल्याने लाभार्थी महिला शासनाकडून राहिलेल्या हप्त्यांबाबत स्पष्ट माहितीच्या प्रतीक्षेत आहेत. दरम्यान, शासनाकडून डिसेंबर आणि जानेवारी महिन्यांच्या हप्त्यांबाबत अद्याप कोणतीही अधिकृत तारीख जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र, जानेवारी महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात प्रलंबित हप्ते जमा होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. शासन या प्रलंबित हप्त्यांबाबत आणि मुदतवाढीबाबत स्पष्ट घोषणा करत नाही, तोपर्यंत लाभार्थी महिलांमधील ही अनिश्चितता कायम राहणार आहे. आता नवीन वर्षाच्या सुरुवातीला सरकार लाडक्या बहिणींना उर्वरित हप्त्यांची भेट देणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# राज्यात १३ उमेदवार बिनविरोध

## भाजपच्या ५ तर शिवसेनेच्या ४ जणांचा समावेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत भाजप-शिवसेना शिंदे गटाच्या महायुतीने मतदानापूर्वीच विजयाचा गुलाल उधळण्यास सुरुवात केली आहे. भाजपचे ५ आणि शिवसेना शिंदे गटाचे ४ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे १२२ सदस्य संख्या असलेल्या कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत सत्तास्थापनेसाठी आवश्यक असलेल्या ६२ जगांपासून महायुती आता केवळ ५३ जागा दूर आहे. त्यामुळे भाजप, शिवसेनेत जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

राज्यात सध्या महापालिका निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या नाट्यातून पुढे येत आता अर्जांची छाननी केली जात असून, यात राजकीय पक्ष एकमेकांना धक्के देत आहेत. तर काही ठिकाणी बिनविरोध विजयाचे गुलाल उधळण देखील सुरू झाली आहे.

भाजपचे उमेदवार बिनविरोध निवडून येत असल्याने भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची रणनीती यशस्वी ठरत असल्याचे बोलले जात आहे. मात्र, आता शिवसेना शिंदे गटाचेही ४ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने खासदार श्रीकांत शिंदे यांची खेळी यशस्वी झाली असल्याचे पाहायला मिळत आहे.

भाजपच्या रेखा चौधरी, आसावरी नवरे, रंजना पेंकर, मंदा पाटील यांच्यासह ज्योती पवन पाटील या बिनविरोध निवडून आल्या आहेत. याचे श्रेय रवींद्र चव्हाण यांच्या रणनीतीला दिले जात आहे. कल्याण - डोंबिवलीमध्ये शिवसेना शिंदे गटाकडून पॅनल क्र. २४ मधून रमेश म्हात्रे, विश्वनाथ राणे, वृषाली रणजित जोशी तर प्रभाग क्र. २८ अ मधून हर्षल राजेश मोरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. हर्षल मोरे हे आमदार राजेश मोरे यांचे चिरंजीव आहेत. येथील सर्व अपक्ष उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर या निवडणुका बिनविरोध झाल्या.

## टीकेची झोड उठल्याने नामुष्कीची वेळ

# भाजप उमेदवाराची माघार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महापालिका निवडणुकीच्या तोंडावर भारतीय जनता पक्षानं पूजा मोरे यांना प्रभाग क्रमांक २ मधून उमेदवारी दिली होती. यानंतर पूजा मोरे यांच्यासह भाजपवर टिकेची झोड उठली. पूजा मोरे यांना याआधी घेतलेल्या भूमिका, त्यांच्या विधानांची आठवण करुन देत भाजपच्या निष्ठावंतांनी त्यांच्या विरोधात मोहीमच उघडली. अखेर मोरे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला.

गेल्या वर्षी जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला. त्यावेळी पूजा मोरे यांचा एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. 'दहशतवाद्यांनी धर्म विचारुन पर्यटकांवर गोळ्या झाडल्या, असं सांगितलं जात आहे. ते साफ खोटं आहे. फक्त हिंदूना मारलं आणि मुस्लिमांना सोडलं, हा संदेश देशात जातोय. पण वास्तव तसं नाही. मी एक हिंदू आहे. पण इथले मुस्लिम बंधू माझ्या सोबत खांद्याला खांदा लावून उभे आहेत. त्यांना ना हिंदूंपासून धोका आहे, ना आम्हाला मुस्लिमांपासून धोका आहे. दहशतवाद्यांना धर्म नसतो, पर्यटकांना धर्म नसतो,' असं पूजा मोरे म्हणाल्या होत्या. पहलगाम हल्ला झाला, त्यावेळी त्या काश्मीरमध्येच होत्या. भाजपनं तिकीट दिल्यावर पूजा मोरे यांचा जुना व्हिडीओ व्हायरल झाला. 'शहरात आल्यावर मला हिंदुत्व कळू लागलं. पहलगाम हल्ल्यानंतर दिलेली प्रतिक्रिया मी लगेच दिलेली होती. पण नंतर मी या हल्ल्यातील पीडितांना भेटले. तेव्हा धर्म विचारुनच हा हल्ला झाल्याचं मला समजलं. त्यांना हिंदू म्हणूनच मारण्यात आलं होतं, ही बाबदेखील माझ्या लक्षात आली. पण माझा आधीचा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला.' असं पूजा मोरे म्हणाल्या.

पूजा मोरे यांचा काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या सोबतचा भारत जोडो यात्रेतील फोटोही व्हायरल झाला. भाजपकडून उमेदवारी जाहीर होताच फोटो व्हायरल झाला.

# ३२ जागांवर युती विरोधात ठाकरे बंधू

## वंचित आघाडीने उमेदवारच दिला नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या २२७ पैकी ३२ जागांवर भाजप-शिवसेना युती आणि शिवसेना (यूबीटी)-महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यात थेट लढत होईल, कारण या जागांवर तिसऱ्या आघाडीचा कोणताही मजबूत उमेदवार रिंगणात नसेल. काँग्रेस-बहुजन वंचित आघाडीने या जागांवर उमेदवार उभे न केल्याने ही परिस्थिती उद्भवली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) निवडणुकीसाठी महायुतीने भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने एक संघ तयार केला आहे, तर उद्धव ठाकरेंची शिवसेना (यूबीटी) आणि राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील मनसे मराठी भाषा आणि संस्कृतीचे "जतन" करण्यासाठी एकत्र आले आहेत. सूत्रांनी सांगितले की, वंचित बहुजन आघाडीला मुंबईत वाटप केलेल्या ६२ जागांपैकी २१ जागांवर उमेदवार उभे करण्यात अडचणी येत होत्या. काही मतदारसंघांमध्ये अयोग्य उमेदवारांना उमेदवारी देऊन व्हीबीएने जागा धोक्यात न घालण्याचा निर्णय घेतला, तर काही मतदारसंघांमध्ये अपूर्ण कागदपत्रांशी संबंधित मुद्दे समोर आले. ही समस्या लक्षात घेऊन, व्हीबीएने मंगळवारी सकाळी काँग्रेसला कळवले की ते त्यापैकी फक्त पाच जागांवर निवडणूक लढवतील आणि उर्वरित १६ जागांवर काँग्रेसला उमेदवार उभे करण्याची परवानगी दिली, असे सूत्रांनी सांगितले. काँग्रेसने आतापर्यंत मुंबईत १४३ उमेदवारांची घोषणा केली आहे. व्हीबीएने ४६ जागा लढवल्या आहेत आणि डाव्या पक्षांसह इतर मित्रपक्षांना सहा जागा देण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये राष्ट्रीय समाज पक्षाचा समावेश आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीने १९५ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. या व्यवस्थेमुळे ३२ जागा तिसऱ्या आघाडीच्या उमेदवाराशिवाय राहतात, ज्यामुळे मतांचे विभाजन होणार नाही. ही परिस्थिती ठाकरे कुटुंबाला फायदेशीर ठरू शकते कारण भाजपविरोधी मते विभागली जाणार नाहीत, असे शिवसेना (यूबीटी) च्या एका नेत्याने सांगितले. अर्जांची छाननी झाल्यानंतर अंतिम चित्र समोर येईल, असे ते म्हणाले. काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीने मुंबईत युतीमध्ये फूट पडण्याच्या वृत्तांना नकार दिला.

## उत्तराखंड उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

# प्रत्येक वचन मोडणे हा बलात्कार नसतो

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**देहरादून : संमतीने झालेले संबंध आणि लैंगिक अत्याचार यांच्यातील कायदेशीर फरक अधोरेखित करणाऱ्या एका महत्त्वपूर्ण निर्णयात, उत्तराखंड उच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की लग्नाच्या वचनभंगात संपणाऱ्या प्रत्येक संमतीने झालेल्या नात्याला लग्नाचे खोटे वचन दिल्याच्या आधारावर आपोआप लैंगिक अत्याचार मानले जाऊ शकत नाही.**



संमतीने झालेले संबंध आणि लैंगिक अत्याचार यांच्यातील कायदेशीर फरक अधोरेखित करणाऱ्या एका महत्त्वपूर्ण निर्णयात, उत्तराखंड उच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की लग्नाच्या वचनभंगात संपणाऱ्या प्रत्येक संमतीने झालेल्या नात्याला लग्नाचे खोटे वचन दिल्याच्या आधारावर आपोआप लैंगिक अत्याचार मानले जाऊ शकत नाही.

लग्नाच्या बहाण्याने शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप करणाऱ्या एका प्रकरणात न्यायमूर्ती आलोक कुमार वर्मा यांच्या खंडपीठाने एका आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर केला. न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की जेव्हा आरोपीचा संबंध सुरू झाल्यापासूनच तक्रारदाराशी लग्न करण्याचा कोणताही हेतू नव्हता तेव्हाच लग्नाचे वचन देणे हा गुन्हा ठरतो. या महत्त्वाच्या वस्तुस्थितीचे निर्धारण, वचन चुकीच्या हेतूने दिले गेले होते की नाही, हे केवळ खटल्याच्या कार्यवाहीदरम्यानच निर्णायकपणे ठरवता येईल, असे एकल खंडपीठाने याचिकेवर विचार करताना निरीक्षण नोंदवले.

वैयक्तिक हक्कांचे महत्त्व अधोरेखित करून, न्यायालयाने कलम २१ अंतर्गत वैयक्तिक स्वातंत्र्याच्या संवैधानिक हमीवर आपला निर्णय दिला आणि त्याला एक मौल्यवान मूलभूत अधिकार म्हणून वर्णन केले. जेव्हा प्रकरणातील विशिष्ट तथ्ये आणि परिस्थिती अशा कारवाईची आवश्यकता दर्शवितात तेव्हाच हा अधिकार कमी केला पाहिजे, असे निकालात नमूद केले आहे, अटकपूर्व संरक्षण नाकारण्यापूर्वी सावधगिरी बाळगण्याची गरज अधोरेखित केली आहे.

उधम सिंह नगर जिल्ह्यातील जसपूर कोतवाली पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ६९ आणि ३५१ (२) अंतर्गत ९ मे रोजी प्राथमिक माहिती अहवाल दाखल करण्यात आला. तक्रारदाराने आरोप केला आहे की आरोपीने लग्नाचे आश्वासन देऊन तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले आणि नंतर वचनबद्धतेला नकार दिला. याचिकाकर्त्याच्या वतीने उपस्थित राहताना, वकिलांनी असा युक्तिवाद केला की आरोपी आणि कथित पीडितेमधील संबंध संमतीने होते. तक्रारदार ही एक समंजस प्रौढ महिला होती आणि आरोपीने कधीही लग्नाचे वचन दिले नाही, असे सादर करण्यात आले. बचाव पक्षाने पुढे असा युक्तिवाद केला की आरोपीचा पूर्वेतिहास स्वच्छ आहे, त्याचा कोणताही गुन्हेगारी इतिहास नाही आणि तो उधम सिंह नगरचा कायमचा रहिवासी होता, त्यामुळे तो फरार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आरोपीला २१ मे रोजी अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला होता आणि न्यायालयाने लादलेल्या सर्व अटींचे पालन केले होते, हे देखील निदर्शनास आणून देण्यात आले.

# विरोधकांचे अर्ज बाद करण्याचे काम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** विरोधकांचे अर्ज बाद करण्याचे काम सुरू असल्याचा गंभीर आरोप मनसे नेते अविनाश जाधव यांनी केला आहे. निवडणूक प्रक्रियेत पक्षपात होत असल्याचा दावा करत त्यांनी थेट निवडणूक अधिकाऱ्यांची नावे घेत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

अविनाश जाधव यांनी सांगितले की, निवडणूक अर्ज छाननीच्या टप्प्यावर विरोधी उमेदवारांचे अर्ज तांत्रिक कारणे पुढे करत मोठ्या प्रमाणावर बाद केले जात आहेत. ही प्रक्रिया पारदर्शक नसून, सत्ताधारी पक्षाच्या उमेदवारांना लाभ मिळावा यासाठीच हे प्रकार घडत असल्याचा आरोप त्यांनी केला.

"लोकशाहीत निवडणूक ही समान संधीची प्रक्रिया असायला हवी. मात्र सध्या जे घडते आहे, ते लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना धक्का देणारे आहे," असे जाधव म्हणाले. निवडणूक अधिकाऱ्यांनी निष्पक्ष भूमिका घ्यावी, अन्यथा या प्रकरणी कायदेशीर मार्गाचा अवलंब केला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. निवडणूक आयोगाने या आरोपांची गांभीर्याने दखल घ्यावी आणि अर्ज छाननी प्रक्रियेबाबत स्पष्टता आणावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. अन्यथा या प्रकारामुळे निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास डळमळीत होईल, असे मत जाधव यांनी व्यक्त केले.

दरम्यान, या आरोपांवर प्रशासनाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र प्रकरणामुळे वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# संपादकीय

## कार्यकर्त्यांचा आवाज

**राज्यात सर्वत्रच सर्वपक्षियांमध्ये सामान्य कार्यकर्ता डावलला गेला असल्याचे महापालिका निवडणुकांनी अधोरेखित केले. वर्षानुवर्षे पक्षाचे काम करणाऱ्या निष्ठावंतांना बाजूला करत, आयात नेत्यांना उमेदवारी दिली गेली. निवडून येण्याची हमी हा एकमेव निकष लावला गेला.**

स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका जवळ आल्या की राजकारणाला खऱ्या अर्थाने वेग येतो. विधानसभेच्या किंवा लोकसभेच्या निवडणुका मोठ्या नेत्यांच्या भोवती फिरतात, तशा महापालिका निवडणुका मात्र कार्यकर्त्यांच्या बळावर लढवल्या जातात. पक्ष स्थानिक पातळीवर किती पोहोचला आहे, हे याच निवडणुकांमधून अधोरेखित होते. कार्यकर्ते, स्थानिक नेते, प्रभागात वर्षानुवर्षे काम करणारी मंडळी आणि अचानक वरून येणारे निर्णय या सगळ्यांचा कस इथे लागतो. महाराष्ट्रभरातून या वेळी जे चित्र दिसते आहे, ते एकसारखेच असून, आम्हाला डावलले गेले, ही भावना एखाद्या शहरापुरती मर्यादित न राहता, ती राज्यव्यापी असल्याचे दिसून येते. कोणताही पक्ष घ्या. भाजप असो, काँग्रेस असो, राष्ट्रवादी असो किंवा शिवसेना. सर्वत्र स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता आहे. अनेकांनी पक्ष वाढवण्यासाठी रस्त्यावर उतरून काम केले, आंदोलनांत सहभाग घेतला, निवडणुकीच्या काळात घरदार सोडून प्रचार केला. मात्र, उमेदवारीचा निर्णय होताना, त्यांच्या नावाऐवजी बाहेरून आलेल्या, कालपर्यंत विरोधी पक्षात असलेल्या किंवा नेतृत्वाच्या जवळच्या एखाद्या व्यक्तीचे नाव जाहीर झाले. यामुळे निर्माण झालेली खदखद ही व्यक्तिगत नाही, तर ती संघटनात्मक अशीच. कार्यकर्त्यांना खरेच डावलले जात आहे का, हा म्हणूनच उपस्थित होतो. याचे उत्तर सोपे अजिबात नाही, पण वास्तव हे कटू आहे. राजकीय पक्षांची निर्णयप्रक्रिया दिवसेंदिवस अधिक केंद्रीकृत होत चालली आहे. स्थानिक समित्या, शहराध्यक्ष, प्रभाग प्रमुख यांची भूमिका माहिती पुरवण्यापुरती मर्यादित राहिली असून, अंतिम निर्णय दिल्ली किंवा मुंबईतील पक्ष कार्यालयातून घेतला जातो. या निर्णयांमध्ये स्थानिक सामाजिक समीकरणे, कार्यकर्त्यांचे योगदान किंवा प्रभागातील वास्तव यापेक्षा जिंकण्याची शक्यता हा एकमेव निकष वरचढ ठरतो. याच ठिकाणी आयात नेतेमंडळी महत्त्वाचे ठरतात. एखादी व्यक्ती एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जेव्हा येते, तेव्हा तिच्या मागे एकगठ्ठा मते आहेत, आर्थिक बळ आहे किंवा प्रशासनात ओळखी आहेत अशी कारणे पुरेशी ठरतात. पक्ष नेतृत्वाचा युक्तिवाद असतो की, निवडणूक जिंकणे हेच अंतिम ध्येय आहे. स्थानिक कार्यकर्ता कितीही प्रामाणिक असला, तरी त्याच्याकडे ही जिंकण्याची हमी नसते, असा समज दृढ होत चालला आहे. मात्र, या गणितात एक मोठी चूक आहे. महापालिका निवडणूक ही आकड्यांची लढाई नसते. ती शहराच्या आत्म्याशी जोडलेली असते. स्थानिक कार्यकर्ता हा त्या शहराचा, त्या प्रभागाचा अविभाज्य भाग असतो. मतदार त्याला ओळखतात, भेटतात, प्रश्न विचारतात. बाहेरून आलेल्या नेत्याला हे नाते प्रस्थापित करायला वेळ लागतो. आणि तोपर्यंत पक्षाचे खरे कार्यकर्ते नाराज होतात. ते उघड बंड करोत किंवा शांतपणे काम थांबवोत. दोन्ही परिस्थितीत पक्षासाठी ते धोक्याचेच ठरते. आणखी एक पैलू म्हणजे राजकारणातील बदललेली संस्कृती. पूर्वी कार्यकर्त्यांना संयम बाळगायला सांगितले जायचे आणि आज नाही, तर उद्या संधी मिळेल, असा दिलासा दिला जायचा. आता ही आश्वासनेही बेगडी ठरू लागली आहेत. कारण आयात नेत्यांसाठी अग्रक्रमाने जागा निर्माण केली जाते आणि निष्ठावंत हे कायम रांगेत असतात. यामुळे कार्यकर्त्यांच्या मनात पक्षाविषयी आपुलकीपेक्षा व्यावहारिक दृष्टी निर्माण होते. निष्ठा ही एकतर्फी राहते. राजकीय पक्षांनी हे लक्षात घ्यायला हवे की कार्यकर्ते नाराज असणे ही भावनिक बाब नाही, तर तो राजकीय इशारा आहे. महापालिका निवडणुका म्हणजे पक्ष संघटनेची एक्स-रे चाचणी असते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकशाही टिकवायची असेल, तर स्थानिक नेतृत्वावर विश्वास ठेवणे अपरिहार्यच. आज राज्यभर ऐकू येणारा कार्यकर्त्यांचा आवाज हा बंडखोरीचा नाही, तर तो आत्मसन्मानाचा आहे. प्रश्न इतकाच आहे की, पक्ष नेतृत्व तो ऐकणार की, नेहमीप्रमाणेच निवडणुकीनंतर त्याकडे दुर्लक्ष करणार?

# मुंबई मनपा: सत्ता आणि अर्थकारण!

**महापालिकेच्या निधीचे वाटप हेतूतः विरोधकांना केले गेले नाही. सत्ताधाऱ्यांच्या प्रभागात मात्र मुबलक निधी दिला गेला. राजकीय स्पर्धेचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांना बसलेला विशेषत्वाने दिसून आला. विकास निधीच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांपासून सत्ताधारी आपला प्रचार करत आहेत. मुंबई महापालिकेची निवडणुकीची तयारी सुमारे तीन वर्षांपूर्वी सुरू झाली होती का, असा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विकास निधीचे वाटप पाहता, तसे दिसून येते. हे चित्र घोषणा किंवा जाहीर कार्यक्रमांमधून नव्हे, तर विकास निधीच्या वाटपातून स्पष्ट झाले आहे.**



जकारणात वेळेपेक्षा संकेत महत्त्वाचे असतात आणि मुंबईत गेल्या तीन वर्षांत जे संकेत मिळाले, ते लोकशाहीच्या दृष्टीने अस्वस्थ करणारे असेच आहेत. कारण महापालिकेचा विकास निधी हा शहरासाठी असतो, पक्षासाठी नव्हे. पण प्रत्यक्षात हा निधी राजकीय सत्तेच्या गणिताचा भाग कसा बनतो, याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. मागील तीन वर्षांत मुंबई महापालिकेच्या विकास कामांसाठी दिलेला जवळपास सारा निधी सत्ताधारी आघाडीच्या वॉर्डांमध्येच गेला. आकडे पाहिले, तर चित्र अधिक स्पष्ट होते. एकूण निधीपैकी जवळपास संपूर्ण हिस्सा भाजप, शिंदे गटाची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या नगरसेवकांच्या वॉर्डांमध्ये खर्च झाला. विरोधी पक्षांच्या वॉर्डांना मिळालेला निधी नगण्य म्हणावा इतका कमी आहे. हे आकडे केवळ प्रशासनिक निर्णयांचे परिणाम आहेत, असे मानणे राजकीय भोळेपणाचे ठरेल. महापालिका निवडणूक ही केवळ एक सोपस्कार नव्हे. ती शहराच्या दैनंदिन आयुष्याशी निगडित असते. रस्ते, पाणी, सांडपाणी, उद्याने, दवाखाने, शाळा हे सगळे विषय थेट नागरिकांच्या आयुष्याशी जोडले गेलेले आहेत. त्यामुळे ज्या भागात ही कामे सुरू आहेत, तिथे विकास दिसतो, आणि जिथे निधी नाही, तिथे हे प्रश्न कायम राहतात. हा फरक मतदाराच्या मनावर ठसतो. आणि तो ठसवणे, हीच निवडणुकीची खरी तयारी असते. प्रशासनाचे म्हणणे नेहमीचे आहे. नियमांनुसार प्रस्ताव आले, ते मंजूर झाले. ज्यांनी प्रस्ताव दिले नाहीत किंवा अपूर्ण दिले, त्यांना निधी मिळाला नाही. कागदोपत्री हे स्पष्टीकरण पटणारे वाटते. पण राजकारण कागदावर केले जात नाही. प्रत्यक्षात विरोधी पक्षांच्या अनेक नगरसेवकांचे प्रस्ताव मंजुरीसाठी महिनोमहिने प्रलंबित ठेवले गेले, अशी तक्रार आहे. काही प्रस्ताव तर चर्चेलाही आले नाहीत. नियम सर्वांसाठी समान असतील, तर परिणाम इतके असमान कसे, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. या निधीवाटपामागील वेळेचे गणितही तितकेच महत्त्वाचे आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या आधी मोठ्या प्रमाणावर विकास कामांना मंजुरी मिळाली. कामे सुरू झाली, भूमिपूजन झाले, फलक लागले. आचारसंहिता लागू होण्याआधी सगळी प्रक्रिया पूर्ण झाल्याचे दाखवले गेले. तांत्रिकदृष्ट्या सगळे बरोबर असले, तरी राजकीय दृष्ट्या ही स्पष्ट तयारी होती. मतदाराला दिसणारा विकास हा प्रचाराचा सर्वांत प्रभावी प्रकार असतो, हे सत्ताधाऱ्यांना नव्याने सांगायची गरज नाही. या सगळ्यातून एक मूलभूत प्रश्न पुढे येतो. महापालिकेचा निधी नेमका कोणाचा आहे? तो सत्ताधाऱ्यांचा नाही, विरोधकांचाही नाही, तर मुंबईकरांचा आहे. पण जेव्हा निधीचा वापर सत्ता टिकवण्यासाठी किंवा सत्ता वाढवण्यासाठी होतो, तेव्हा लोकशाहीच्या आत्म्यालाच नख लागते. विरोधी वॉर्डांतील नागरिक हेही तितकेच कर भरतात, तेही तितकेच मुंबईचा भाग आहेत. पण त्यांच्या भागात रस्ते खराब असतील, पाणी समस्या कायम असतील, तर त्याची किंमत त्यांनी का म्हणून मोजायची, हा प्रश्न आहे. पक्षीय राजकारणाच्या स्पर्धेची शिक्षा म्हणून सामान्यांनी का मोजावी, हाही प्रश्न. मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प अनेक राज्यांच्या बजेटपेक्षा मोठा आहे.

एवढ्या मोठ्या आर्थिक शक्तीचे राजकीय साधनात रूपांतर होणे धोक्याचे आहे. कारण आज सत्ताधारी आघाडी निधी वापरते आहे; उद्या दुसरी आघाडी सत्तेत आली, तर तीही तेच करेल. या साखळीत नुकसान फक्त शहराचे आणि नागरिकांचे होते. महापालिका निवडणूक ही केवळ पक्ष बदलाची प्रक्रिया नसते. ती शहराच्या कारभाराची दिशा ठरवते. त्या दिशेवर आधीच काटेकोरपणे आर्थिक खुणा उमटवल्या जात असतील, तर निवडणूक ही स्पर्धा राहत नाही, तर औपचारिकता बनते. समान संधीचा खेळाचा मैदान हा लोकशाहीचा मूलभूत नियम आहे. निधीवाटपातूनच तो नियम मोडला जात असेल, तर निवडणुकीचे अर्थकारण गंभीर प्रश्नांच्या भोवऱ्यात अडकते. मुंबईत जे घडते आहे, ते उद्या इतर शहरांतही घडू शकते. म्हणून हा प्रश्न केवळ मुंबई महापालिकेपुरता मर्यादित नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांचा अर्थ, त्यांची स्वायत्तता आणि निधीचा न्याय्य वापर या सगळ्यांचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. विकास हा राजकीय बक्षीस ठरू लागला, तर लोकशाही केवळ मतपेटीत उरते. शहर मात्र पक्षीय सीमांनी विभागले जाते आणि ते कोणाच्याच हिताचे नाही.

## मुख्य निवडणूक निरीक्षकांकडून तयारीचा सखोल आढावा

### अभिरक्षा कक्ष, मतमोजणी कक्ष, नामनिर्देशन प्रक्रिया व माध्यम संनियंत्रणाची पाहणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या निवडणूकपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी मुख्य निवडणूक निरीक्षक निरंजन सुधांशू यांनी आज महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनास भेट देत विविध कक्षांची सखोल पाहणी केली.

या पाहणीदरम्यान महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी अभिरक्षा कक्ष, प्रस्तावित मतमोजणी कक्ष, आचारसंहिता कक्ष तसेच नामनिर्देशन प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली. प्रत्येक कक्षातील कार्यपद्धती, नोंदवही व्यवस्थापन व प्रशासकीय संरचनेचा मुख्य निवडणूक निरीक्षकांनी आढावा घेतला.

आचारसंहिता कक्षामार्फत प्राप्त होणाऱ्या तक्रारी, त्यांचे वर्गीकरण, नोंदणी व त्यावरील कार्यवाहीची माहिती यावेळी सादर करण्यात आली. तसेच प्रसार माध्यम व संनियंत्रण समिती कार्यालयात माध्यमे, सोशल मीडिया व डिजिटल प्लॅटफॉर्मवरील निवडणूकसंबंधित मजकुराच्या निरीक्षण व नोंदीची कार्यपद्धतीही दाखवण्यात आली.

चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात असलेल्या अभिरक्षा कक्षाची पाहणी करताना ईव्हीएम यंत्रांची साठवणूक, सीलबंद स्थिती, सुरक्षा व प्रवेश नियंत्रण व्यवस्था तपासण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विविध जिल्ह्यांतून आणलेली ईव्हीएम यंत्रे सुरक्षितरीत्या ठेवण्यात आल्याची माहिती देण्यात आली. यासोबतच प्रस्तावित मतमोजणी कक्षाची रचना, प्रवेश-निर्गमन व्यवस्था व प्रशासकीय तयारीचाही आढावा घेण्यात आला.

यानंतर मुख्य निवडणूक निरीक्षकांनी चिंचवड येथील 'ब' क्षेत्रीय कार्यालयातील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयास भेट देत नामनिर्देशन प्रक्रियेची पाहणी केली. आज नामनिर्देशन पत्रे भरण्याची अंतिम तारीख असल्याने प्रक्रिया सुरळीत सुरू असल्याची माहिती देण्यात आली. याचवेळी आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी आकुर्डी येथील हेडगेवार भवन व थेरगाव येथील 'ग' क्षेत्रीय कार्यालयास भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

दरम्यान, स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी एलईडी व्हॅनचा शुभारंभ मुख्य निवडणूक निरीक्षक निरंजन सुधांशू यांच्या हस्ते करण्यात आला. या व्हॅनद्वारे मतदानाचे महत्त्व व प्रक्रिया याबाबत माहितीपूर्ण चित्रफिती दाखवून मतदारांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे.



## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची प्रामाणिक सेवा महापालिकेच्या कार्यक्षमतेसाठी मोलाची

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ पिंपरी चिंचवड महापालिकेत २७ सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार

**पिंपरी चिंचवड :** महापालिकेत कार्यरत असताना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि जबाबदारीने बजावलेली सेवा ही संस्थेच्या कार्यक्षमतेसाठी अत्यंत मोलाची ठरली आहे. सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य आरोग्यदायी, आनंदी व समाधानकारक जावे, तसेच सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे प्रतिपादन उप आयुक्त संदीप खोत यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत मधुकर पवळे सभागृह येथे माहे डिसेंबर २०२५ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या २२ व स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या ५ अशा एकूण २७ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार उप आयुक्त संदीप खोत यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते शुभेच्छा देताना बोलत होते.

या कार्यक्रमास मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, कर्मचारी महासंघाचे बबन झिंजुर्डे, मुख्य लिपिक उमेश बांदल, माया वाकडे तसेच महापालिका कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्यांमध्ये प्रशासन अधिकारी, मुख्याध्यापक, लेखापाल, परिचारिका, अभियंते, वाहनचालक, मजूर, सफाई कर्मचारी आदी विविध विभागांतील कर्मचाऱ्यांचा समावेश होता. तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांनाही यावेळी सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी केले,

## दिव्यांग मतदारांसाठी जनजागृतीचा अभिनव उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी चिंचवड:** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्वीप (SVEEP) कार्यक्रमांतर्गत दिव्यांग मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी दिव्यांग भवन फाउंडेशन येथे विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत पथनाट्य सादरीकरण, फ्लॅश मॉब, स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली तसेच दिव्यांग बांधवांसाठी साईन लँग्वेजमध्ये मतदानाची शपथ देण्यात आली.

पिंपरी चिंचवड महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी २०२६ रोजी होत असून, मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली शहरभर विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत.

यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर म्हणाल्या की, दिव्यांग मतदारांसाठी मतदान केंद्रांवर आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून समाजाच्या प्रत्येक घटकाचा लोकशाही प्रक्रियेत सहभाग सुनिश्चित करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. उपायुक्त अण्णा बोदडे यांनी दिव्यांग बांधवांनी मतदानाचा हक्क बजावत 'पर्पल जल्लोष' साजरा करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास दिव्यांग भवन फाउंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एस. बी. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये 'नवरस' उत्सवाची रंगत

### विद्यार्थ्यांच्या कलात्मक सादरीकरणातून नृत्य, नाटक व संगीताचा सुरेल संगम; मान्यवरांची उपस्थिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. 'नवरस' या संकल्पनेवर आधारित या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी कला, संस्कृती आणि सर्जनशीलतेचा अप्रतिम संगम साधत विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने रसिकांची मने जिंकली.



या कार्यक्रमास पुणे जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर, निवृत्त सैनिक अधिकारी डॉ. राजेंद्र मोरे, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्रतिनिधी डॉ. योगेश भावसार, सिनियर कॉलेजच्या प्राचार्या डॉ. स्मृती पाठक, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य संदीप पाटील, तसेच विद्यार्थी व पालक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दीपप्रज्वलन व सरस्वती वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर पाहुण्यांचे स्वागत, प्रास्ताविक, मार्गदर्शन आणि बक्षीस वितरणाचा कार्यक्रम पार पडला. 'नवरस' अंतर्गत नृत्य, नाटक, संगीत व स्कीटच्या माध्यमातून वीर, करुण, हास्य, रौद्र, अद्भुत, भयानक व शांत अशा मानवी भावभावनांचे प्रभावी दर्शन घडविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट अभिनयामुळे रंग, राग आणि भावना यांचा अद्भुत आविष्कार रसिकांसमोर उभा राहिला.

यावेळी वर्षभरात विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना चषक व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. तसेच पोस्टर मेकिंग व दांडिया स्पर्धेत विशेष यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

## लोकशाही सक्षमीकरणासाठी मतदानाचा संकल्प करा-आयुक्त श्रावण हर्डीकर

### पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'सखी आंगण' येथे स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती उपक्रम उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** भारतीय संविधानाने दिलेला मतदानाचा हक्क हा केवळ अधिकार नसून प्रत्येक नागरिकाची महत्त्वाची जबाबदारी आहे. प्रत्येक निवडणुकीत मतदान केल्याने लोकशाही अधिक सक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी बनते. येणारे २०२६ हे नववर्ष प्रत्येक नागरिकाने नियमित मतदान करण्याचा संकल्प करण्यासाठी उत्तम संधी असून, या संकल्पाची सुरुवात येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीतून करावी, असे आवाहन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी केले.



महापालिकेच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या स्वीप (SVEEP) कार्यक्रमांतर्गत शहरातील विविध भागांत मतदान जनजागृती उपक्रम सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आकुर्डी रेल्वे स्टेशन परिसरातील 'सखी आंगण' येथे समाज विकास विभागाच्या वतीने मतदान जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी आयुक्त हर्डीकर बोलत होते.

या कार्यक्रमाला अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे, उपायुक्त ममता शिंदे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महिला बचत गटांतील शेकडो महिला उपस्थित होत्या. उपस्थित महिलांनी १०० टक्के मतदान करण्याचा निर्धार व्यक्त करत मतदानाची शपथ घेतली.

आयुक्त हर्डीकर म्हणाले की, नववर्ष हे नव्या आशा, संधी आणि सकारात्मक बदलांचे प्रतीक आहे. 'सखी आंगण'सारखे उपक्रम महिलांना आर्थिक स्वावलंबनासोबतच आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव देणारे आहेत. या ठिकाणी उपलब्ध संधींचा लाभ घेऊन महिलांनी स्वतःचा व कुटुंबाचा विकास साधावा. तसेच १५ जानेवारी रोजी होणाऱ्या महापालिका निवडणुकीत सर्व पात्र मतदारांनी निर्भयपणे व स्वेच्छेने मतदान करून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा आणि कुटुंबीय व मित्रपरिवारालाही मतदानासाठी प्रेरित करावे, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात मतदानाचे महत्त्व अधोरेखित करणारे पथनाट्य आणि फ्लॅश मॉब सादर करण्यात आले. माणिक खटींग, निलम वाघमारे, अनिकेत शिंदे, शिवप्रसाद पासलकर, भरत साळुंखे यांनी या पथनाट्याचे प्रभावी सादरीकरण केले. यावेळी आयुक्त हर्डीकर यांनी 'सखी आंगण' येथील महिला बचत गटांनी चालवलेल्या ४९ खाद्यगाळ्यांना भेट देऊन विविध खाद्यपदार्थांची खरेदी करत महिलांच्या उपक्रमांचे कौतुक केले. मतदान जनजागृती आणि महिला सक्षमीकरणाचा हा उपक्रम लोकशाही अधिक बळकट करणारा ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## महापालिका निवडणुकीसाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' ऑनलाइन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०२६ साठी प्रत्यक्ष मतदान १५ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज दाखल करताना आवश्यक असणारे थकबाकी 'ना हरकत प्रमाणपत्र' (NOC) देण्यासाठी महापालिकेने प्रथमच पूर्णतः ऑनलाइन प्रणाली राबवली असून, या उपक्रमाला उमेदवारांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

मागील निवडणुकांमध्ये 'ना हरकत प्रमाणपत्र' मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ लागत होते तसेच विलंब होत असल्याने उमेदवारांची गैरसोय होत होती. ही अडचण लक्षात घेऊन महापालिकेने pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. या प्रणालीद्वारे महापालिकेच्या एकूण १४ विभागांना एकाच वेळी जोडण्यात आले असून, उमेदवाराचा अर्ज सर्व विभागांकडे एकाचवेळी तपासणीसाठी पाठवण्यात येत आहे.

दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत या ऑनलाइन प्रणालीद्वारे एकूण १ लाख १८ हजार १७७ अर्ज प्राप्त झाले. यापैकी खात्यांच्या शिफारशीनुसार ५०१ अर्ज बाद करण्यात आले, तर २ हजार ४ अर्जदारांना ऑनलाइन 'ना हरकत प्रमाणपत्र' वितरित करण्यात आले.

विशेष म्हणजे, या प्रणालीमुळे सरासरी २४ तासांत 'ना हरकत' देणे शक्य झाले असून, शेवटच्या दोन दिवसांत अनेक अर्जदारांना अवघ्या ४ तासांत प्रमाणपत्र मिळाले. या प्रणालीमुळे उमेदवारांची धावपळ कमी झाली असून, त्यातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनामुळे हा उपक्रम यशस्वी ठरल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### मांदळेवाडीत बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद

**मांदळेवाडी :** (ता. आंबेगाव) येथील धरणवस्ती परिसरात गुरुवार (दि. १) रोजी पहाटे तीन ते चारच्या सुमारास एक नर बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. कान्होबा मंदिर परिसरात लावलेल्या पिंजऱ्यात सुमारे पाच वर्षांचा नर बिबट्या अडकल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. मात्र झंझळ वस्ती, पोखरकर वस्ती, ढगेवस्ती तसेच पिंपळवाडीतील भैरवनाथ मंदिर डोंगर परिसरात अद्याप चार ते पाच बिबटे असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

### खडकवाडी येथे भैरवनाथ महाराज मंदिर सुशोभिकरण

**खडकवाडी :** (ता. आंबेगाव) येथील भैरवनाथ महाराज मंदिर गावठाण सुशोभिकरण व मंदिर जीर्णोद्धारानिमित्त शनिवार (दि. ०३) रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे ४ ते ६ काकड आरती, सकाळी ७ ते ८ अभिषेक, सकाळी १० ते १२ भव्य पालखी मिरवणूक, दुपारी १ ते ३ व सायंकाळी ६ ते ८ महाप्रसाद, तसेच सायंकाळी ४ ते ६ ह.भ.प. विशाल महाराज खोले यांचे कीर्तन होणार आहे.

### पिंपळवाडीत बिबट पिंजऱ्यात जेरबंद

**पिंपळवाडी–पाबळ :** येथे अंदाजे पाच वर्षांचा नर बिबट वन विभागाच्या पिंजऱ्यात अडकला. काही दिवसांपासून परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने भीतीचे वातावरण होते. पकडलेल्या बिबट्याची वैद्यकीय तपासणी करून त्याला माणिकडोह येथे हलविण्यात आले. बिबट पकडल्याने ग्रामस्थांना दिलासा मिळाला असला, तरी अजूनही परिसरात बिबट्याचा वावर असण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन वन विभागाने केले आहे.

### आंबेगावच्या आदिवासी पट्ट्यात ‘गुलाबी क्रांती’; भीमाशंकर स्ट्रॉबेरी क्लस्टरकडे वाटचाल

# स्ट्रॉबेरी शेतीतून आदिवासी शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचा नवा मार्ग!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अवसरी :** आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीला पर्याय म्हणून स्ट्रॉबेरीसारख्या नगदी पिकाची निवड करत शाश्वत उत्पन्नाचा नवा मार्ग स्वीकारला आहे. फुलवडे येथील शेतकरी अर्जुन भारमळ व गौरव गभाले यांच्यासह अनेक आदिवासी शेतकऱ्यांनी यंदा स्ट्रॉबेरीचे उत्पादन घेतले असून, या पिकामुळे त्यांच्या आर्थिक जीवनात सकारात्मक बदल घडू लागला आहे. उत्पादन, बाजारपेठ आणि शासनाच्या अनुदानामुळे आदिवासी भागात ‘गुलाबी क्रांती’ची चाहूल लागली आहे.


आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागातील फुलवडे येथे बहरलेली स्ट्रॉबेरीची शेती दाखवताना शेतकरी अर्जुन भारमळ व त्यांच्या पत्नी.

मागील वर्षी आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी पट्ट्यातील १७ गावांमधील ५५ शेतकऱ्यांनी सुमारे २.७५ हेक्टर क्षेत्रात स्ट्रॉबेरीची लागवड केली होती. यंदा मात्र या पिकाकडे शेतकऱ्यांचा वाढता कल दिसून येत असून, तब्बल १३० शेतकऱ्यांनी ७.२५ हेक्टर क्षेत्रात स्ट्रॉबेरीची लागवड केली आहे. उत्पादन समाधानकारक मिळत असल्याने स्ट्रॉबेरी उत्पादकांची संख्या दरवर्षी वाढत आहे.

फुलवडे, फलोदे, तळेघर, जांभोरी, गाडेवाडी, गोहे बुद्रुक, गोहे खुर्द, राजेवाडी, पोखरी, चिखली, पाटण, डोण, माळीण, असाणे, बोरघर, अडिवरे, पंचाळे, निगडाळे आदी गावांमध्ये स्ट्रॉबेरीचे उत्पादन घेतले जात आहे. या परिसराला भीमाशंकर तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळाचा लाभ होत असून, राज्यभरातून येणाऱ्या भाविक व पर्यटकांमुळे स्ट्रॉबेरीसाठी चांगली बाजारपेठ उपलब्ध होत आहे. त्यामुळे उत्पादित स्ट्रॉबेरीला योग्य दर मिळत असल्याचे शेतकरी सांगतात.

केंद्रीय अर्थसंकल्पातील (न्यूक्लिअस बजेट) योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना स्ट्रॉबेरी लागवडीसाठी अर्थसहाय्य मिळत आहे. यंदा आदिवासी विभागामार्फत १५० स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांना प्रति पाच गुंठ्यासाठी ४० हजार ३०० रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत शेतकरी संख्या आणि लागवडीचे क्षेत्र वाढले असून, भीमाशंकर स्ट्रॉबेरी क्लस्टर साकारण्याच्या दिशेने ही वाटचाल सुरू आहे.

फुलवडे येथील शेतकरी अर्जुन भारमळ म्हणाले, “मी पाच गुंठे क्षेत्रात सुमारे ३ हजार १०० स्ट्रॉबेरी रोपांची लागवड केली आहे. पीक चांगले बहरले असून उत्पादन सुरू झाले आहे. पारंपरिक भात पिकातून अपेक्षित उत्पन्न मिळत नव्हते. त्यामुळे यंदा प्रायोगिक तत्त्वावर स्ट्रॉबेरीची लागवड केली. शासनाकडून मिळालेल्या अनुदानामुळे मोठी मदत झाली असून, आता या पिकातून चांगले उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा आहे.”

या उपक्रमासाठी कृषी विभागाकडून कृषी सहाय्यक चेतन भोईर, अरविंद मोहरे यांचे तांत्रिक मार्गदर्शन शेतकऱ्यांना मिळत आहे. तसेच भीमाशंकर क्लस्टर साकारण्यासाठी माजी मंत्री व आंबेगाव तालुक्याचे प्रतिनिधी दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घोडेगाव आदिवासी प्रकल्प संचालक प्रदीप देसाई, तालुका कृषी अधिकारी सिद्धेश ढवळे, कृषी सहाय्यक रवींद्र पारधी आदी अधिकारी सातत्याने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहेत.

प्रदीप देसाई यांनी सांगितले की, “भीमाशंकर स्ट्रॉबेरी क्लस्टर उभारणीसाठी प्रयत्न सुरू आहेत. भविष्यात ‘भीमाशंकर स्ट्रॉबेरी’ हा स्वतंत्र ब्रॅण्ड विकसित करण्याचा मानस असून, लवकरच भीमाशंकर स्ट्रॉबेरी फेस्टिव्हल आयोजित करण्यात येणार आहे.”

एकूणच स्ट्रॉबेरी शेतीमुळे आदिवासी शेतकऱ्यांना स्थिर व शाश्वत उत्पन्नाचा पर्याय मिळत असून, आंबेगाव तालुक्याच्या डोंगराळ भागात नव्या कृषीक्रांतीची पायाभरणी होत आहे.

## कोरेगाव भीमातील स्वागताने दिला सामाजिक सलोख्याचा संदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ पोलीस महासंचालक सुनिल फुलारे यांचे प्रतिपादन

+ हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवरही ग्रामस्थांचा आदर्श पायंडा; विजयस्तंभ अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा येथे काही वर्षांपूर्वी झालेल्या दुर्दैवी हिंसाचारामुळे परिसराला मोठे गालबोट लागले होते. जाळपोळीच्या घटनांमध्ये कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले होते. मात्र, त्या कटू आठवणींवर मात करत कोरेगाव भीमा ग्रामस्थ व ग्रामपंचायतीच्या वतीने विजयस्तंभ अभिवादनासाठी दरवर्षी येणाऱ्या अनुयायांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्याचा आदर्श पायंडा पाडण्यात आला आहे. या उपक्रमातून समाजात शांतता, बंधुता आणि मानवतेचा संदेश जात असल्याचे प्रतिपादन कोल्हापूर पोलीस परिक्षेत्राचे महासंचालक सुनिल फुलारे यांनी केले.

कोरेगाव भीमा येथे एक जानेवारी शौर्यदिनानिमित्त विजयस्तंभास मानवंदना देण्यासाठी राज्यासह देशाच्या विविध भागातून मोठ्या संख्येने अनुयायी येतात. या पार्श्वभूमीवर कोरेगाव भीमा ग्रामपंचायतीच्या वतीने येणाऱ्या समाजबांधवांचे स्वागत करण्यात आले. यावेळी पोलीस महासंचालक सुनिल फुलारे यांनी ग्रामस्थांच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. या कार्यक्रमास पोलीस अधीक्षक संदीपसिंग गील, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, प्रमोद क्षिरसागर, कोरेगाव भीमा ग्रामपंचायतीचे सरपंच संदीप ढेरंगे, पोलीस पाटील मालन गव्हाणे, ग्रामपंचायत सदस्य मनीषा गव्हाणे, संपत गव्हाणे, ग्रामपंचायत अधिकारी विमल आव्हाड यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. शौर्यदिनानिमित्त आलेल्या अनुयायांना सुरक्षित आणि सुलभपणे कार्यक्रमस्थळी ये-जा करता यावी यासाठी प्रशासन व पोलिसांकडून चोख नियोजन करण्यात आले होते.

## भागवत एकादशी दिनी आळंदीत भक्तीचा महोत्सव

### माऊली मंदिरात भाविकांची गर्दी; इंद्रायणी नदीकाठी दीपदान उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** येथील पुत्रदा भागवत एकादशीच्या पावन पर्वानिमित्त संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी मंदिरात भक्ती, श्रद्धा आणि परंपरेचा अनोखा संगम पाहायला मिळाला. हरिनाम गजरात आणि प्रथा-परंपरांचे पालन करीत भागवत एकादशी मोठ्या भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

माऊलींच्या संजीवन समाधी मंदिरातील गाभाऱ्यात आकर्षक पुष्पसजावट करण्यात आली होती. पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. परंपरेनुसार श्रींना फराळाचा महानैवेद्य अर्पण करण्यात आला. देवस्थानच्या वतीने भाविकांना खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले. मंदिर परिसर, नगरप्रदक्षिणा मार्ग आणि आळंदी शहर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेले होते.



इंद्रायणी नदी घाटावर दिवसभर भाविकांची मोठी वर्दळ होती. भाविकांनी आचमन करत नदीचे दर्शन, पूजन व दीपदान केले. स्थानमहात्म्य जपत इंद्रायणी काठावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. हरिनाम गजरात भाविकांनी मंदिर व नगरप्रदक्षिणा पूर्ण केली.

दरम्यान, इंद्रायणी आरती सेवा समितीच्या वतीने नित्यनैमित्तिक एकादशी निमित्त इंद्रायणी नदी घाटावर भव्य आरती उत्साहात संपन्न झाली. या आरतीत महिला, ज्येष्ठ नागरिक व भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी संयोजक अनिता झुजम, अर्जुन मेदनकर, दिलीप महाराज ठाकरे, महिला बचत गट महासंघाच्या अध्यक्षा सुवर्णा काळे यांच्यासह छाया देवरे, रेणुका शेजुळ, मयुरी मनाडे, शोभाताई धोंडसे, शैलाताई तापकीर, कौसल्या देवरे, पुष्पाताई लेंडघर, नीलमताई कुरधोंडकर, शारदा सोळुंके, शोभा कुलकर्णी, सावित्रीबाई घुंडरे, विमल मुसळे, सुरेखा काळभोर, जयश्री भागवत, विद्या आढाव, काशीबाई आडीकणे, सुनिता हिळे, अलका पतंगे, उषा पाटील, सृष्टी हिल्ली, राधिका आडकीने, वर्षा खिल्लारी, मीरा कांबळे, अनिता शिंदे, सुमन व्यवहारे, आशा शिंदे, शिराबाई कदम, सुरेखा कुऱ्हाडे, द्वारका घोंगडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## गुंड निवडून जाणे लोकशाहीला घातक – आनंदराज आंबेडकर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ कोरेगाव भीमा शौर्यदिनानिमित्त विजयस्तंभास अभिवादन

+ फ्रेंच पद्धतीची निवडणूक प्रणाली राबविण्याची मागणी

**शिक्रापूर :** सध्याच्या निवडणूक प्रक्रियेत गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींना प्राधान्य दिले जात असून लोकसभेपासून ते पंचायत समितीपर्यंत अशा लोकांचे निवडून येणे हे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. त्यामुळे विद्यमान निवडणूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याची गरज असल्याचे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू व रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी व्यक्त केले.

कोरेगाव भीमा (ता. शिरुर) येथे २०८ व्या शौर्यदिनानिमित्त ऐतिहासिक विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी आनंदराज आंबेडकर उपस्थित होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना निवडणूक प्रक्रियेतील दोष, सामाजिक जाणीव आणि लोकशाही मूल्यांवर सविस्तर भाष्य केले. याप्रसंगी भीमा कोरेगाव शौर्यदिन समन्वय समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे, कोरेगाव भीमा विजयरणस्तंभ सेवा समितीचे अध्यक्ष सर्जेराव वाघमारे, रिपब्लिकन विद्यार्थी सेना प्रदेशाध्यक्ष विवेक बनसोडे, रिपब्लिकन कामगार सेना महाराष्ट्र प्रमुख युवराज बनसोडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आनंदराज आंबेडकर म्हणाले की, दरवर्षी कोरेगाव भीमा शौर्यदिनाला देशभरातून व राज्याबाहेरून लाखो अनुयायी येतात. येथे आल्यावर लोकांना आपल्या शौर्यपूर्ण इतिहासाची जाणीव होते आणि स्वाभिमानाचा नवा आत्मविश्वास मिळतो. हा लढा अन्यायकारक जातीप्रथा आणि अन्यायाविरोधात लढलेला असल्याने तो मानवतेचा आणि लोकशाहीचा प्रतीक आहे.

सध्याच्या परिस्थितीत निवडणूक प्रक्रिया व्यक्तीकेंद्रित झाल्याने गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले उमेदवार निवडून येतात, हे देशासाठी धोकादायक आहे.

## कोरेगाव भीमाचा इतिहास मानवतेचा – प्रकाश आंबेडकर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा येथील ऐतिहासिक विजयस्तंभ हा केवळ एका युद्धाचा स्मारक नसून, तो मानवतेचा, समतेचा आणि जातीप्रथेतील अन्यायकारक व्यवस्थेविरोधातील लढ्याचा साक्षीदार आहे. कोरेगाव भीमातील या लढ्यामुळेच भारताच्या नव्या पर्वाची सुरुवात झाली, असे स्पष्ट प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केले.




+ एक जानेवारी शौर्यदिनानिमित्त विजयस्तंभास अभिवादन; शासनाच्या व्यवस्थांबाबत समाधान, महापालिका निवडणुकांवरही भाष्य

एक जानेवारी शौर्यदिनानिमित्त कोरेगाव भीमा (ता. शिरूर) येथे विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी प्रकाश आंबेडकर उपस्थित होते. यावेळी त्यांनी विजयस्तंभास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी बोलताना त्यांनी सांगितले की, कोरेगाव भीमातील लढा हा जातीप्रथेच्या अन्यायकारक, अमानवी व्यवस्थेविरोधात होता. या लढ्याने समतेचा, स्वाभिमानाचा आणि मानवतेचा संदेश दिला असून, तो आजही समाजाला दिशा देणारा आहे.

यावेळी त्यांनी शासनाकडून एक जानेवारी शौर्यदिनासाठी करण्यात आलेल्या व्यवस्थांबाबत समाधान व्यक्त केले. नागरिक व अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांसाठी सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच नियोजनबद्ध उपाययोजना करण्यात आल्याचे नमूद करत, या प्रयत्नांमुळे कार्यक्रम शांततेत व सुव्यवस्थितपणे पार पडत असल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकारांशी संवाद साधताना प्रकाश आंबेडकर यांनी आगामी महापालिका निवडणुकांबाबतही भूमिका स्पष्ट केली. वंचित बहुजन आघाडीने पक्षाच्या बाहेरील उमेदवारांना संधी न देता, पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांनाच उमेदवारी दिली असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई महापालिकेतील जागावाटपाबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, काँग्रेस पक्षाने वंचित बहुजन आघाडीला तुलनेने अधिक जागा दिल्या. ज्या ठिकाणी काँग्रेसकडे सक्षम व मजबूत उमेदवार होते त्या जागा काँग्रेसकडेच ठेवण्यात आल्या, तर ज्या ठिकाणी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार मजबूत होते त्या जागांवर वंचितने उमेदवारी घेतली, असेही त्यांनी नमूद केले. कोरेगाव भीमा येथील विजयस्तंभ अभिवादनाच्या निमित्ताने मोठ्या संख्येने अनुयायी, नागरिक व विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय किटचे वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोपरे (ता. जुन्नर) :** अतिदुर्गम आदिवासी भागातील कोपरे गावात महिलांच्या सक्षमीकरणासह आरोग्य जनजागृती साधणारा बहुआयामी उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. चाईल्ड फंड इंडिया, पंचायत समिती जुन्नर, प्राथमिक आरोग्य केंद्र मढ, गौरीशंकर सामाजिक प्रतिष्ठान, हाय स्पीड स्किल हब, मराठा चेंबर्स प्रतिष्ठान अँड ॲग्रीकल्चर तसेच ग्रामपंचायत कोपरे यांच्या संयुक्त सहकार्याने महिलांसाठी एकदिवसीय मोफत डिजिटल मार्केटिंग कार्यशाळा, मोफत उद्यम आधार वाटप आणि आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमांतर्गत आयोजित डिजिटल मार्केटिंग कार्यशाळेत सुमारे ५५ महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. महिलांना डिजिटल माध्यमांचा वापर, ऑनलाईन व्यवसायाच्या संधी, स्वावलंबनासाठी आवश्यक कौशल्ये आणि उद्यम आधार नोंदणीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे स्थानिक महिलांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. याच कार्यक्रमात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोपरे येथील ३५ विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य व शालेय किटचे वाटप करण्यात आले. या साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांना हातभार लागणार असून शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. महिलांचे आरोग्य, बालकांचे पोषण, तसेच नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व यावर विशेष भर देण्यात आला. कार्यक्रमास पंचायत समिती जुन्नरचे ग्रामसेवक तुषार साबळे, पेसा विस्तार अधिकारी तुकाराम लोहकरे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष व चाईल्ड फंड इंडिया संस्थेचे ब्रँड ॲम्बेसिडर रविंद्र भोर, चाईल्ड फंड इंडिया सीनियर प्रकल्प अधिकारी अभिजीत मदने, वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन खेडकर, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. अतुल शिनारे, आरोग्य सहाय्यक गजानन भोईर यांच्यासह आशा सेविका, ग्रामपंचायत सदस्य, बचत गट प्रतिनिधी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा परिषदेची आचारसंहिता लवकरच

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्पष्ट संकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा येथील ऐतिहासिक विजयस्तंभास २०८ व्या शौर्यदिनानिमित्त राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पहाटे मानवंदना अर्पण केली. यावेळी बोलताना त्यांनी महानगरपालिका निवडणुका पूर्ण झाल्यानंतर लवकरच जिल्हा परिषदेची आचारसंहिता लागू होणार असल्याची घोषणा केली. निवडणुकीचे दिवस सुरू असतानाही राज्य सरकारने शौर्यदिन कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


कोरेगाव भीमा येथील ऐतिहासिक विजयस्तंभाला मानवंदना देताना उपमुख्यमंत्री अजित पवार, आरपीआयचे सचिन खरात, बार्टीचे सुनील वारे व अन्य मान्यवर.

+ विजयस्तंभाला २०८ व्या शौर्यदिनी उपमुख्यमंत्र्यांकडून मानवंदना

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, “राज्यातील १३ कोटी जनतेच्या वतीने शौर्यदिनी विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी येथे आलो आहे. येथे येणाऱ्या अनुयायांसाठी जिल्हा प्रशासन व पोलीस यंत्रणेमार्फत उत्तम नियोजन करण्यात आले असून सुरक्षितता, वाहतूक, आरोग्य व स्वच्छतेच्या सुविधा प्रभावीपणे राबविण्यात आल्या आहेत.” निवडणूक आचारसंहिता सुरू असतानाही शासनाने आवश्यक निधी दिल्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पिंपरी-चिंचवड व पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकांबाबत बोलताना अजित पवार यांनी शिंदे शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रित लढण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे सांगितले. “आज उदय सामंत यांच्याशी यासंदर्भात चर्चा करणार असून, युती झालेल्या पक्षांना काही जागा सोडण्यात आल्या आहेत. स्थानिक पातळीवर आघाड्याही केल्या जातील,” असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रसंगी रिपब्लिकन पार्टीचे अध्यक्ष सचिन खरात, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. सचिन खरात यांनी कोरेगाव भीमा परिसराच्या विकासाबाबत उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा झाल्याचे सांगितले. शौर्यदिनानिमित्त मोठ्या संख्येने आलेल्या अनुयायांमुळे कोरेगाव भीमा परिसरात भक्तिमय व प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले होते.

## प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांचा भावपूर्ण सेवानिवृत्ती सन्मान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बनकरफाटा :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब वाघिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओतूर येथे दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांचा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती सन्मान समारंभ भावपूर्ण वातावरणात पार पडला. त्यांच्या दीर्घ, निष्ठावान व प्रेरणादायी शैक्षणिक सेवेबद्दल महाविद्यालयाच्या वतीने यथोचित गौरव करण्यात आला.


कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य डॉ. व्ही. एम. शिंदे उपस्थित होते. त्यांनी डॉ. अवघडे यांच्या कार्याचा आढावा घेताना, NAAC/IQAC समन्वयक म्हणून महाविद्यालयाची गुणवत्ता वाढविण्यासाठी त्यांनी केलेल्या विशेष प्रयत्नांची प्रशंसा केली. संशोधन मार्गदर्शक म्हणून त्यांनी ४ पीएच.डी. संशोधकांना मार्गदर्शन केले असून २८ शोधनिबंध, ८ संदर्भग्रंथ व २ पाठ्यपुस्तके प्रकाशित केली आहेत, असे नमूद केले. अध्यक्षीय मनोगतात प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी विद्यार्थ्यांच्या हितासाठी राबविलेल्या बस सेवा, वसतिगृह सुविधा, पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, प्रवेशद्वार सुशोभीकरण यांसारख्या उपक्रमांचा उल्लेख केला. कार्यक्रमात प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. शेवटी डॉ. अवघडे यांना निरोगी व समाधानी सेवानिवृत्त जीवनासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### श्री भैरवनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाबळ येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

## संस्कारित व सक्षम पिढीसाठी सामूहिक प्रयत्न गरजेचे– नीलमताई खेडकर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाबळ :** सुसंस्कारित, सक्षम आणि जबाबदार पिढी घडवण्यासाठी केवळ शाळा किंवा शिक्षक नव्हे, तर पालक, समाज आणि प्रशासन या सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे सौ. नीलमताई खेडकर (पिंगळे) यांनी केले. शिक्षण प्रसारक मंडळ, पाबळ संचलित श्री भैरवनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाबळ यांच्या वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन २०२५–२६ च्या कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत पाबळचे सरपंच श्री. सोपानराव जाधव (पाटील) हे होते. व्यासपीठावर मंडळाचे उपाध्यक्ष श्री. कुमार बगाटे, सचिव श्री. पांडुरंग शेठ लोखंडे, सहसचिव श्री. विकास शेठ बगाटे, खजिनदार श्री. गोरक्ष आप्पा गावडे यांच्यासह संचालक मंडळातील सदस्य उपस्थित होते. तसेच उपसरपंच सौ. रोहिणीताई चव्हाण यांचीही उपस्थिती लाभली.

सौ. नीलमताई खेडकर पुढे म्हणाल्या की, ग्रामीण भागात प्रचंड गुणवत्ता आणि बुद्धिमत्ता दडलेली आहे. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण मेहनत आणि आत्मविश्वास मिळाल्यास ग्रामीण विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात यश मिळवू शकतात. स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी, अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि ध्येय निश्चिती याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. शिक्षणाबरोबरच मूल्यशिक्षण, शिस्त आणि सामाजिक भान हे घटकही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणात श्री. सोपानराव जाधव यांनी विद्यालयाची शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील वाटचाल मांडली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण प्रसारक मंडळ सातत्याने प्रयत्नशील असून, भविष्यातही गुणवत्तावाढीसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशालेचे प्राचार्य श्री. सुदाम पिंगळे, उपप्राचार्य श्री. तुकाराम ताम्हाणे, पर्यवेक्षिका सौ. राजश्री रणपिसे, ज्येष्ठ शिक्षिका सौ. गायकवाड मॅडम, एन.सी.सी. प्रमुख श्री. राहुल गायकवाड तसेच संदीप गवारी, दत्तात्रय लांघे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

### स्नेहसंमेलन सोहळा अत्यंत उत्साहात

● वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी लोककला, नृत्य, गायन, नाटिका तसेच समाजप्रबोधनात्मक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळालेली ही रंगमंचीय संधी सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली. कार्यक्रमास पालक, ग्रामस्थ तसेच आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्यामुळे हा स्नेहसंमेलन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडला.

## सारांश वृत्त

### कर्नाटकातील निवडणुका यावर्षी

**बेंगळुरू :** कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी सांगितले की, सत्ताधारी काँग्रेस सरकारने २०२६ मध्ये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे वचन दिले आहे. नवीन वर्षात लोकांसाठी शांती आणि आनंद सुनिश्चित करण्यासाठी सरकार काम करेल आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करेल, असेही त्यांनी सांगितले. २०२६ मध्ये, काँग्रेस पक्षाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची प्रतिज्ञा घेतली आहे, असे ते म्हणाले.

### नवीन वर्षाचे मिझोरममध्ये स्वागत

**ऐझवाल :** मिझोरममध्ये गुरुवारी धार्मिक आणि पारंपारिक उत्साहात नवीन वर्ष साजरे करण्यात आले, ते सामुदायिक मेजवानी आणि चर्च सेवांसह साजरे करण्यात आले. या उत्सवाचा भाग म्हणून गुरुवारी राज्यभरातील चर्चमध्ये आभार मानण्याचा समारंभ, पूजा सेवा, प्रार्थना आणि सामूहिक गायन (झैखावम) आयोजित करण्यात आले. सहसा, ख्रिश्चन बहुल असलेल्या मिझोराम राज्यात नवीन वर्ष दोन दिवस साजरे केले जाते.

### कोलकाताची हवेची गुणवत्ता 'खराब'

**कोलकाता :** नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी कोलकाताची हवेची गुणवत्ता "खराब" होती, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. पश्चिम बंगाल प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, दुपारी २ वाजता जाधवपूर येथे PM २.५ चा हवा गुणवत्ता निर्देशांक ३१५, फोर्ट विल्यम २३५, व्हिक्टोरिया २५५, रवींद्र भारती विद्यापीठ २२७, रवींद्र सरोवर २१३, बालीगंज २३६ आणि विधान नगर (सॉल्ट लेक) २७३ नोंदवला गेला. २०१-३०० चा निर्देशांक खराब मानला जातो आणि दीर्घकाळ संपर्कात राहिल्यास बहुतेक लोकांना श्वास घेण्यास त्रास होतो. ३०१-४०० हा खूप खराब मानला जातो आणि त्याने श्वसनाचे आजार होतात.

## डीआरडीओची क्षेपणास्त्र चाचणी यशस्वी

# एकाच लाँचरमधून दोन 'प्रलय'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** डीआरडीओने बुधवारी एकाच लाँचरमधून सलग दोन प्रलय क्षेपणास्त्रांचे यशस्वी प्रक्षेपण केले. पिनाका लाँग रेंज गाईडेड रॉकेटच्या यशस्वी पहिल्या उड्डाणानंतर एका दिवसात ही चाचणी घेण्यात आली. संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे की, दोन्ही क्षेपणास्त्रांनी अपेक्षित मार्गक्रमण केले आणि चांदीपूर येथील एकात्मिक चाचणी केंद्राने तैनात केलेल्या ट्रॅकिंग सेन्सर्सद्वारे पुष्टी केल्याप्रमाणे सर्व उड्डाण उद्दिष्टे पूर्ण केली. वापरकर्त्यांच्या मूल्यांकन चाचण्यांचा भाग म्हणून सकाळी १०.३० वाजता ओडिशाच्या किनाऱ्यावर उड्डाण चाचणी घेण्यात आली. प्रलय हे



स्वदेशी बनावटीचे सॉलिड प्रोपेलेंट क्वासी-बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आहे जे उच्च अचूकता सुनिश्चित करण्यासाठी प्रगत मार्गदर्शन आणि नेव्हिगेशन प्रणाली वापरते. ते विविध लक्ष्यांवर मारा करण्यासाठी विविध प्रकारचे वॉरहेड वाहून नेऊ शकते.

हे क्षेपणास्त्र हैदराबाद येथील रिसर्च सेंटर इमरतने संरक्षण संशोधन आणि विकास प्रयोगशाळा, प्रगत प्रणाली प्रयोगशाळा, शस्त्रास्त्र संशोधन आणि विकास स्थापना, उच्च ऊर्जा सामग्री संशोधन प्रयोगशाळा, संरक्षण धातुकर्म संशोधन प्रयोगशाळा, टर्मिनल बॅलिस्टिक्स संशोधन प्रयोगशाळा, संशोधन आणि विकास स्थापना अभियंते आणि एकात्मिक चाचणी श्रेणी यासह अनेक डीआरडीओ प्रयोगशाळांच्या सहकार्याने विकसित केले आहे.

संरक्षण मंत्रालयाने सांगितले की या चाचण्यांसाठी, दोन विकास-सह-उत्पादन भागीदारांनी प्रणाली एकत्रित केल्या होत्या. वरिष्ठ डीआरडीओ शास्त्रज्ञ, सशस्त्र दलांचे प्रतिनिधी आणि उद्योग प्रतिनिधींनी प्रक्षेपणाचे साक्षीदार म्हणून काम केले.

संरक्षणमंत्री राजनाथसिंह म्हणाले की, प्रलय क्षेपणास्त्राच्या यशस्वी प्रक्षेपणामुळे या प्रणालीची विश्वासार्हता सिद्ध झाली आहे. डीआरडीओचे अध्यक्ष आणि संरक्षण संशोधन आणि विकास विभागाचे सचिव डॉ. समीर व्ही कामत म्हणाले की, या कामगिरीवरून असे दिसून येते की ही प्रणाली वापरकर्त्यांसाठी वापरण्याच्या जवळ आहे.

यापूर्वी, पिनाका लाँग रेंज गाईडेड रॉकेटची पहिली उड्डाण चाचणी चांदीपूर येथील एकात्मिक चाचणी श्रेणी येथे यशस्वीरित्या पार पडली.

हे रॉकेट आर्मामेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंटने हाय एनर्जी मटेरियल्स रिसर्च लॅबोरेटरीच्या सहकार्याने डिझाइन केले होते आणि त्याला डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट लॅबोरेटरी अँड रिसर्च सेंटर इमरत यांनी पाठिंबा दिला होता.

आयटीआर आणि प्रूफ अँड एक्सपेरिमेंटल एस्टॅब्लिशमेंट यांनी या चाचणीचे समन्वय साधले होते. हे इन-सर्व्हिस पिनाका लाँचरवरून लाँच करण्यात आले होते, जे दर्शवते की एकाच लाँचरमधून वेगवेगळ्या रेंजचे वेगवेगळे पिनाका प्रकार डागता येतात.

# मद्यपान केल्याचा संशय पायलटला उतरवले...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** व्हँकूवरहून दिल्लीला जाणाऱ्या एअर इंडियाच्या एका वैमानिकाला मद्यपान केल्याच्या संशयावरून उड्डाण करण्यापूर्वी विमानातून खाली उतरवण्यात आले. ही घटना एका आठवड्यापूर्वी घडली असून, ती नुकतीच उघडकीस आली. सध्या या घटनेची चौकशी सुरू आहे. पर्यायी वैमानिकाची व्यवस्था करण्यासाठी फ्लाइट एआय १८६ ला काही तास उशिराने उड्डाण करावे लागले. एअर इंडियाने या घटनेची माहिती नागरी उड्डयन महासंचालनालयाला, विमान वाहतूक नियामकांना दिली आहे.

एका निवेदनात, एअर इंडियाच्या प्रवक्त्याने म्हटले आहे की, २३ डिसेंबर २०२५ रोजी व्हँकूवरहून दिल्लीला जाणाऱ्या एआय१८६ या विमानाला शेवटच्या क्षणी विलंब झाला कारण कॉकपिट क्रू मेंबरपैकी एकाला प्रस्थानापूर्वी विमानातून उतरवण्यात आले. कॅनेडियन अधिकाऱ्यांनी पायलटच्या ड्युटीसाठी फिटनेसबाबत चिंता व्यक्त केली, त्यानंतर क्रू मेंबरला पुढील चौकशीसाठी नेण्यात आले. सुरक्षा नियमांनुसार, उड्डाण चालविण्यासाठी पर्यायी वैमानिकाची नियुक्ती करण्यात आली होती, ज्यामुळे विलंब झाला, असे त्यात म्हटले आहे. चौकशी प्रक्रियेदरम्यान वैमानिकाला उड्डाण कर्तव्यावरून काढून टाकण्यात आले आहे. चौकशीचा निकाल येईपर्यंत, कोणत्याही उल्लंघनाची पुष्टी झाल्यास कंपनीच्या धोरणानुसार कठोर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असे निवेदनात म्हटले आहे.

# भारताने पाकला ठणकावले!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** बांगलादेशमध्ये परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी एका पाकिस्तानी अधिकाऱ्याशी हस्तांदोलन केले या वस्तुस्थितीला पाकिस्तानने अतिशयोक्ती करण्यास सुरुवात केली. पाकिस्तान इतका निराश झाला आहे की त्याने या घटनेचे कौतुक केले आहे की ते एक मोठे यश आहे आणि पाकिस्तान नेहमीच चर्चेसाठी तयार असल्याचे म्हटले आहे. तथापि, ही केवळ एक सौजन्यपूर्ण भेट होती असे स्पष्ट करून भारताने पाकिस्तानला त्याची जागा दाखवून दिली आहे.

पाकिस्तानने म्हटले की, राष्ट्रीय असेंब्लीचे अध्यक्ष सरदार अयाज सादिक आणि भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांची बांगलादेशची राजधानी ढाका येथे एक छोटीशी भेट झाली. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी दोन्ही नेत्यांची एक छोटीशी भेट झाली. भेटीनंतर, पाकिस्तानच्या राष्ट्रीय असेंब्ली सचिवालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, जेव्हा सादिक झिया यांच्या निधनाशी संबंधित शोकपुस्तकात संदेश लिहिण्यासाठी संसद भवनात पोहोचले तेव्हा जयशंकर यांनी त्यांची भेट घेतली आणि विविध देशांच्या परराष्ट्र मंत्री आणि प्रतिनिधींच्या उपस्थितीत हस्तांदोलन केले. निवेदनात म्हटले आहे की, मे २०२५ नंतर भारताने सुरू केलेली पाकिस्तान आणि भारत यांच्यातील ही पहिलीच महत्त्वाची उच्चस्तरीय बैठक आहे. पहलगाम हल्ल्याच्या चौकशीसाठी सतत संवाद आणि मोजमाप आणि सहकार्यात्मक पावले उचलण्याची गरज पाकिस्तानने व्यक्त केली आहे. तथापि, भारताने स्पष्टपणे सांगितले आहे की ही भेट केवळ एक सौजन्यपूर्ण भेट होती. भारतीय अधिकाऱ्यांनी यावर भर दिला आहे की ते या शोकाच्या क्षणी गोष्टी सभ्य ठेवू इच्छितात, असे भारताने नमूद केले.

# पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसचे 'स्वबळ'?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** बिहार विधानसभा निवडणुकीत झालेल्या लाजिरवाण्या पराभवानंतर, काँग्रेस पश्चिम बंगालमध्ये आपली रणनीती बदलू शकते. डाव्या आघाडीशी युती करण्याऐवजी पक्ष स्वतंत्रपणे निवडणुका लढवू शकतो. पश्चिम बंगालमध्ये युती केल्याने केरळमधील डाव्या आघाडीच्या सरकारला होणारा विरोध काँग्रेसला महागात पडेल, अशी भीती पक्षाला आहे.

पश्चिम बंगालमध्ये, काँग्रेस आणि डाव्या आघाडीने मागील अनेक विधानसभा आणि लोकसभा निवडणुका युतीने लढवल्या आहेत. २०१६ मध्ये काँग्रेसने ४४ आणि डाव्या आघाडीने २६ जागा जिंकल्या. तथापि, २०२१ मध्ये कोणत्याही पक्षाला एकही जागा मिळाली नाही. दरम्यान, २०१६ मध्ये तीन जागा जिंकणाऱ्या भाजपने ३८ टक्के मतांसह ७७ जागांवर प्रगती केली.

या युतीमुळे पश्चिम बंगाल आणि केरळ दोन्ही ठिकाणी काँग्रेसला मोठा फटका बसला. केरळमध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफ आणि डावी आघाडी (एलडीएफ) आमनेसामने आली. दोन्ही राज्यांमध्ये निवडणुका जवळजवळ एकाच वेळी होतात, त्यामुळे एका राज्यात युती आणि दुसऱ्या राज्यात विरोधी पक्षामुळे पक्षाचे नुकसान झाले.

काँग्रेसच्या सर्वोत्तम प्रयत्नांनंतरही, डाव्या आघाडीने २०२१ मध्ये सलग दुसऱ्यांदा सरकार स्थापन करण्यात यश मिळवले आणि ४० वर्षांचा विक्रम मोडला. त्यामुळे, केरळ निवडणुकीत त्यांचा विरोध कमकुवत होऊ नये म्हणून पक्ष यावेळी पश्चिम बंगालमध्ये डाव्यांपासून अंतर राखत आहे. २०१६ पासून केरळमध्ये एलडीएफ सत्तेत आहे. काँग्रेस २०२६ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुका स्वबळावर लढवू इच्छिते. बंगाल काँग्रेसचे अध्यक्ष शुभंकर सरकार म्हणतात की पक्षाचे संघटन मागील वर्षांच्या तुलनेत मजबूत झाले आहे. परिणामी, ते काही जागा जिंकू शकतात. डाव्या आघाडीशी युती करणे गैरसोयीचे असल्याने, त्यांनी काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाला स्वबळावर निवडणुका लढवण्याचा विचार करण्याचे आवाहन केले आहे. २०२१ मध्ये काँग्रेसने डाव्या आघाडी आणि पिरजादा अब्बास सिद्दीकीच्या धर्मनिरपेक्ष आघाडीसोबत युती करून निवडणुका लढवल्या, परंतु दोन्ही पक्षांना एकही जागा मिळाली नाही. दरम्यान, केरळ काँग्रेसनेही पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाला पश्चिम बंगालमध्ये डाव्या आघाडीसोबत युती करू नये असे आवाहन केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाची कामगिरी चांगली होती. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतही काँग्रेस चांगली कामगिरी करेल, असे म्हटले आहे.

# पाकिस्तान अजूनही सावरते आहे...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** गेल्या वर्षी मे महिन्यात भारताने ऑपरेशन सिंदूर राबवले, त्यामुळे पाकमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले गेले. भारताविरुद्ध भ्याड हल्ले केल्यास त्याचा परिणाम काय होतो, हे पाकिस्तानला पुन्हा एकदा दाखवून दिले. भारताने या कारवाईत ११ पाकिस्तानी हवाई तळ पूर्णपणे उद्ध्वस्त केले. पाकिस्तानची स्थिती इतकी बिकट झाली आहे की तो अद्याप या हल्ल्यांमधून सावरलेला नाही. तज्ज्ञांच्या मते, पाकिस्तानचे नवीन वर्ष देखील या जखमांमधून सावरण्यात घालवले जाईल.

एका वृत्तानुसार, भारताच्या कारवाईला सात महिन्यांहून अधिक काळ लोटल्यानंतरही पाकिस्तान अजूनही नुकसान भरून काढण्याचे काम करत आहे. उपग्रह प्रतिमा आणि संरक्षण तज्ज्ञांचा हवाला देत, अहवालात असे म्हटले आहे की पाकिस्तान अजूनही बहुतेक हवाई तळांचे नुकसान दुरुस्त करत आहे. या अहवालात या पाकिस्तानी हवाई तळांच्या सद्यस्थितीची माहिती देखील देण्यात आली आहे. पाकिस्तानने अधिकृतपणे कबूल केले आहे की नूर खान एअरबेसचे नुकसान झाले आहे आणि त्याची तांत्रिक दुरुस्ती सुरू आहे. नोव्हेंबरमध्ये प्रसिद्ध झालेल्या उपग्रह प्रतिमांनी याची पुष्टी केली आहे. भोलारी एअरबेसवर दुरुस्तीचे काम देखील सुरू आहे. अलीकडील उपग्रह प्रतिमांवरून असे दिसून आले आहे की भारतीय हवाई हल्ल्यात नुकसान झालेले हँगर ताडपत्रीने झाकलेले आहे, जे सूचित करते की दुरुस्तीचे काम सुरू आहे.

दरम्यान, मुरीद, मुशाफ, जेकबाबाद आणि रफीकी सारख्या पाकिस्तानी हवाई तळांवर काही भागांची दुरुस्ती करण्यात आली आहे आणि काही भागांवर काम सुरू आहे. हल्ल्यांनंतर हँगर्स आणि धावपट्ट्यांना झालेल्या नुकसानीमुळे उड्डाण ऑपरेशन्सवर गंभीर परिणाम झाला आहे. सुक्कुर, चुनियान, पसरूर हवाई तळ, सियालकोट आणि स्कार्दू हवाई तळ देखील खराब स्थितीत आहेत.या आठवड्याच्या सुरुवातीला, ऑपरेशन सिंदूर नंतर भारतीय हल्ल्यांमध्ये त्यांच्या हवाई तळांना झालेल्या नुकसानाची पाकिस्तानने पहिल्यांदाच कबुली दिली.

## तृणमूल काँग्रेसचा आयोगाला इशारा

# मतदार यादी स्वीकारणार नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** तृणमूल काँग्रेसचे नेते अभिषेक बॅनर्जी यांनी बुधवारी सांगितले की, पश्चिम बंगालमध्ये प्रसिद्ध झालेल्या मतदार यादीच्या विशेष सघन सुधारणा (एसआयआर) बद्दल निवडणूक आयोग त्यांच्या चिंता दूर करण्यात अपयशी ठरला आहे आणि जर विसंगती आढळल्या तर पक्ष अंतिम मतदार यादी स्वीकारणार नाही. आम्ही त्याविरुद्ध कायदेशीर लढाई लढू, बॅनर्जी यांनी पत्रकारांना सांगितले.

पश्चिम बंगालमध्ये एसआयआर प्रक्रियेबाबत तृणमूल काँग्रेसच्या १० सदस्यीय शिष्टमंडळाने आयोगाच्या पूर्णपीठाला भेटल्यानंतर बॅनर्जी यांनी ही टिप्पणी केली. निवडणुकीत मतचोरी ईव्हीएमद्वारे नव्हे तर मतदार याद्यांद्वारे होत असल्याचा आरोप बॅनर्जी यांनी केला आणि जर विरोधी पक्षांनी आक्रमकपणे हा मुद्दा उपस्थित केला असता तर ते महाराष्ट्र, हरियाणा आणि बिहारसारख्या राज्यांमध्ये जिंकू शकले असते असा दावाही त्यांनी केला. मसुदा मतदार यादीबाबत निवडणूक आयोगाकडे त्यांनी अनेक चिंता व्यक्त केल्या, असे बॅनर्जी म्हणाले.

तृणमूल काँग्रेसच्या राष्ट्रीय सरचिटणीसांनी दावा केला की बैठकीदरम्यान मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) ज्ञानेश कुमार यांचे




वर्तन आक्रमक होते. ते म्हणाले, जेव्हा आम्ही बोलू लागलो तेव्हा ते (सीईसी) संतापू लागले... आयोगाने त्यांच्या चिंतांकडे लक्ष दिले नाही असा आरोप बॅनर्जी यांनी केला. एसआयआर पूर्ण झाल्यानंतर अंतिम मतदार यादी स्वीकारणार का असे विचारले असता, ते म्हणाल्या, त्यात काही विसंगती असतील तर आम्ही ती का स्वीकारू? आम्ही कायदेशीररित्या लढू, असेही ते म्हणाले.

घुसखोरीची भीती पसरवून पश्चिम बंगालला बदनाम करण्याचे षड्यंत्र रचले जात असल्याचा दावा अभिषेक बॅनर्जी यांनी केला. ज्या ५८ लाख मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत त्यापैकी बांगलादेशी आणि रोहिंग्यांची यादी देण्याचे आव्हान त्यांनी निवडणूक आयोगाला दिले. मतदार यादीचा गैरवापर होत असल्याचा आरोप त्यांनी केला आणि सर्व समविचारी पक्षांना मतदार यादीकडे लक्ष देण्याचे आवाहन केले.

तृणमूल नेता म्हणाला, मी सर्वांना आवाहन करतो की, मतांची चोरी मतदार यादींद्वारे होत आहे, ईव्हीएमद्वारे नाही. लोकांना मतदानाचा अधिकार हिरावून घेण्यासाठी ते कोणते अल्गोरिदम किंवा सॉफ्टवेअर वापरत आहेत हे तुम्हाला माहिती नाही. ते मतदार यादीचा शस्त्र म्हणून वापर करण्याचा प्रयत्न करत आहेत. पूर्वी मतदार सरकार निवडत असत; आता सरकार मतदारांना निवडत आहे, असा आरोपही त्यांनी केला. ते म्हणाले, भाजपने महाराष्ट्र, दिल्ली आणि बिहारमध्ये ८८ टक्के स्ट्राइक रेटने विजय मिळवला. हा योगायोग आहे का? ही मतांची चोरी आहे. मतांची चोरी ईव्हीएमद्वारे होत नाही. इतर राज्यांमधील कोणताही राजकीय पक्ष हे उघड करू शकला नाही.

निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, तृणमूल काँग्रेसच्या शिष्टमंडळाला हे स्पष्ट करण्यात आले आहे की तळागाळातील राजकीय प्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांकडून निवडणुकीशी संबंधित कोणत्याही कर्मचाऱ्यांना धमकावणे खपवून घेतले जाणार नाही आणि पश्चिम बंगाल सरकारने प्रत्येक बीएलओला वाढीव मानधन त्वरित जारी करावे. कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही त्रासदायक व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाईल, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

# भाजपचे राष्ट्राध्यक्ष केव्हा सूत्रे स्वीकारणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाचे कार्यवाहक अध्यक्ष नितीन नवीन हे जानेवारीच्या मध्यात अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारतील अशी अपेक्षा आहे. तथापि, या संदर्भात अद्याप कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. सध्या ही जबाबदारी केंद्रीय मंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्याकडे आहे, जे २०२० पासून या पदावर आहेत. महत्त्वाचे म्हणजे, नवीन अशा वेळी भाजपचे नेतृत्व स्वीकारत आहेत जेव्हा पक्ष पश्चिम बंगालसह अनेक राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकांची तयारी करत आहे.

भाजपच्या सूत्रांचा हवाला देत माध्यमांनी असे वृत्त दिले आहे की, राष्ट्रीय स्तरावरील बदलाची गरज पूर्ण झाली आहे, ज्यामुळे नवीन यांना जानेवारीच्या मध्यापर्यंत पक्षाचे सर्वोच्च पद मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत ते हे पद भूषवतील. एका भाजप नेत्याने सांगितले की, आम्ही देशभरातील १,०५० पैकी ९५० जिल्ह्यांपैकी १८ लाख मतदान केंद्रांपैकी १७ लाखांहून अधिक मतदान केंद्रांवर आणि ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांपैकी ३० जिल्ह्यांमध्ये पक्षाच्या घटनेनुसार संघटनात्मक निवडणुका घेतल्या आहेत. पुढील प्रक्रिया देखील पूर्ण केली जाईल. निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतर, राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीला सुमारे तीन ते चार दिवस लागतील अशी अपेक्षा आहे. त्यानंतर, राष्ट्रीय परिषद त्याला मान्यता देईल.

पक्षाच्या दुसऱ्या सूत्राने वृत्तपत्राला सांगितले की, ही प्रक्रिया मकर संक्रांतीच्या आसपास जाहीर होऊ शकते, त्यामुळे नवीन अध्यक्षांची घोषणा २० जानेवारीपर्यंत होण्याची शक्यता आहे.

२०२५ च्या अखेरीस बिहारचे आमदार नितीन नवीन यांची भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती होणे हे पक्षातील पिढीजात बदलाचे लक्षण म्हणून पाहिले जात आहे. २०२६ मध्ये पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी येथील विधानसभा निवडणुकांची जबाबदारी त्यांच्यावर असेल. बंगालमधील निवडणुका सर्वात आव्हानात्मक असू शकतात असे मानले जाते.

## स्वित्झर्लंडमधील रिसॉर्टमध्ये स्फोट

**नवी दिल्ली :** स्वित्झर्लंडमध्ये गुरुवारी नवीन वर्षाच्या जल्लोषात एक मोठी दुर्घटना घडली. येथील एका स्की रिसॉर्टमध्ये झालेल्या स्फोटात अनेक जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्विस पोलिसांनी गुरुवारी सकाळी सांगितले की, क्रॅन्स मोंटाना या लक्झरी अल्पाइन स्की रिसॉर्ट शहरातील एका बारमध्ये हा स्फोट झाला. पोलिसांनी सांगितले की, या स्फोटात अनेक लोकांचा मृत्यू झाला आहे आणि अनेक जण जखमी झाले आहेत. अज्ञात कारणामुळे स्फोट झाला.

# अंजेला चकमाची हत्या; भेदभावाविरोधात मोर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**देहरादून :** त्रिपुरातील २४ वर्षीय अंजेल चकमा याच्या हत्येच्या निषेधार्थ ईशान्येकडील विद्यार्थ्यांनी येथे मेणबत्ती मोर्चा काढला आणि कथित वांशिक भेदभावाविरुद्ध घोषणा देत न्यायाची मागणी केली.

'युनिफाइड त्रिपुरा स्टुडंट्स असोसिएशन'च्या बॅनरखाली, डेहराडूनमधील विविध संस्थांमधील विद्यार्थी बुधवारी गांधी पार्कबाहेर जमले आणि हातात मेणबत्त्या घेऊन घड्याळ टॉवर पर्यंत कूच केले. इतर राज्यांतील काही विद्यार्थीही या निषेधात सामील झाले.

चकमा यांचे चित्र असलेले बॅनर हातात घेऊन विद्यार्थ्यांनी "वंशवाद थांबवा", "आम्ही भारतीय आहोत" आणि "आम्हाला न्याय हवा आहे" अशा घोषणा दिल्या. यूटीएसए, डेहराडूनचे सरचिटणीस चुरंता त्रिपुरा यांनी आरोप केला की पोलिस हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करत आहेत आणि म्हणूनच ते वंशवादाशी संबंधित प्रकरण म्हणून हाताळत नाहीत. नवीन वर्षाच्या उत्सवामुळे वाहतुकीची समस्या निर्माण होत असल्याने पोलिसांनी त्यांना निषेध मोर्चा थांबवण्यास सांगितले, असा आरोपही त्यांनी केला.

येथील एका खासगी विद्यापीठात एमबीएच्या अंतिम वर्षाचा विद्यार्थी असलेल्या चकमावर ९ डिसेंबर रोजी तरुणांनी हल्ला करून गंभीर जखमी केल्याचा आरोप आहे.

## २०२६ मध्ये ७२ रिक्त जागांसाठी होतेय निवडणूक

# राज्यसभेत एनडीए अधिक मजबूत होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** २०२६ मध्ये होणाऱ्या राज्यसभेच्या ७२ रिक्त जागांसाठीच्या निवडणुकांचा परिणाम प्रमुख नेत्यांच्या भविष्यावर तसेच केंद्रीय राजकारणातील सत्ताधारी भाजप आणि विरोधी काँग्रेसच्या रणनीतींवर होईल. विविध राज्य विधिमंडळांमधील पक्षाच्या पदांमुळे, भाजप आणि एनडीए अधिक मजबूत होतील, तर काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांना वाढत्या अडचणींना तोंड द्यावे लागेल.

राज्यसभेच्या अंकगणितात फारसा बदल होणार नाही, परंतु एनडीए आपले बहुमत मजबूत करेल आणि भाजपची संख्याही वाढेल. यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये सरकारचे कायदेविषयक काम अधिक सुलभ होईल. त्याच वेळी, सरकारला कोंडीत पकडण्याची विरोधकांची रणनीती कमकुवत होईल. राज्यसभेच्या अधिकृत आकडेवारीनुसार, भाजपकडे सध्या १०३ खासदार आहेत आणि एनडीएकडे १२६ आहेत. २०२६ मध्ये, भाजपच्या ३० खासदारांचा कार्यकाळ संपेल आणि पक्ष ३२ जागा कायम ठेवेल याची खात्री आहे. काही फेरफार केल्यास, पक्ष आणखी तीन जागा जिंकू शकतो. पक्षाचे सहयोगी पक्ष चार खासदार जोडतील, ज्यात तेलुगू देसम पार्टी, जनसेना, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रत्येकी एक खासदार असेल. दोन खासदार कमी असले तरी, एनडीए एकंदरीत फायदेशीर स्थितीत राहील. नामांकित खासदार असलेले माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई देखील मार्चमध्ये निवृत्त होत आहेत. त्यांच्या जागी येणारा कोणीही सरकारला पाठिंबा देण्याची शक्यता आहे.

या राज्यसभेच्या निवडणुका विशेषतः महत्त्वाच्या आहेत कारण अनेक प्रमुख नेत्यांचा कार्यकाळ संपत आहे. यामध्ये केंद्र सरकारमधील मंत्री आणि विविध पक्षांमधील प्रमुख नेत्यांचा समावेश आहे. जर मंत्री पुन्हा निवडून आले नाहीत तर त्यांना सरकारमध्ये राहणे कठीण होईल आणि इतर प्रमुख नेत्यांनाही अडचणींना सामोरे जावे लागेल.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा, दिग्विजय सिंग, शरद पवार, केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी, बीएल बर्मा, जॉर्ज कुरियन इत्यादी प्रमुख नेत्यांचा कार्यकाळ संपत आहे. या व्यतिरिक्त प्रेमचंद गुप्ता, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, रामनाथ ठाकूर, प्रियंदास चकवा, रामनाथ ठाकूर, प्रवीण चव्हाण, कृष्णवंडे आदींचा समावेश आहे. रामगोपाल यादव, नीरज शेखर, राम जी, शक्ती सिंह गोहिल, अभिषेक मनु सिंघवी, थंबी दुराई, तिरुची सिवा आणि सर्वोच्च न्यायालयाचे नामनिर्देशित माजी मुख्य न्यायाधीश रंजन गोगोई यांचा समावेश आहे.

२०२६ मध्ये ज्या ७२ जागांसाठी निवडणुका होणार आहेत त्यापैकी ३७ जागांसाठी एप्रिलमध्ये, २३ जागांसाठी जूनमध्ये, एका जागेसाठी जुलैमध्ये आणि ११ जागांसाठी नोव्हेंबरमध्ये निवडणुका होणार आहेत. एप्रिलमध्ये ज्या ३७ जागांसाठी निवडणुका होणार आहेत त्यात आसाम, बिहार, छत्तीसगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, तामिळनाडू, तेलंगणा, पश्चिम बंगाल यांचा समावेश आहे, तर नोव्हेंबरमध्ये ज्या ११ जागांसाठी निवडणुका होणार आहेत त्यापैकी सर्वात महत्त्वाच्या उत्तर प्रदेशातील १० जागा असतील. याशिवाय जूनमध्ये होणाऱ्या २३ जागांसाठीच्या निवडणुकांमध्ये आंध्र प्रदेश, झारखंड, कर्नाटक, मध्य प्रदेश यासारख्या महत्त्वाच्या राज्यांचा समावेश आहे.

उत्तर प्रदेशमध्ये सर्वाधिक १० जागा रिक्त आहेत. त्यापैकी आठ जागा भाजपच्या, एक समाजवादी पक्षाच्या (सपा) आणि एक बसपाच्या आहेत. निवडणुकीनंतर भाजपला सात जागा मिळण्याची अपेक्षा आहे, तर समाजवादी पक्षाला (सपा) दोन जागा मिळतील. भाजप, त्यांच्या मित्रपक्षांसह, आणखी एक जागा जिंकू शकेल, परंतु बसप राज्यसभेतून बाहेर पडेल हे जवळजवळ निश्चित आहे. उत्तराखंडमध्ये एक जागा रिक्त असेल, तर भाजप एक जागा कायम ठेवेल.